वाचनालय शाखा.
२२६०
२५१४१८८
म. ग्रं. सं. का. , वाचनालय शाखा.
२२६० । २५१४१८८
विषय काव्य
BVBK-0402260

छत्रपतींचे पंतप्रधान–७

# सवाई माधवराव


लेखक

श्री. के. देवधर


BVBK-0402260


पंढरी प्रकाशन

प्रकाशन क्र. ६२


या आवृत्तीचे हक्क पंढरी प्रकाशन, पुणे ३०.

प्रकाशिका :
सौ. सुप्रिया श्रीकांत डंके
पंढरी प्रकाशन,
१६/२२४, लोकमान्यनगर, पुणे–३०.

प्रकाशनाचे सर्व हक्क
सौ. निर्मला अरगडे यांचेकडे

प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट १९७७
पुनर्मुद्रण : मार्च १९८८

मुखपृष्ठ : एस्. के. परब

मुद्रक :
भ. रा. पाटील,
३५३ नारायण पेठ,
लक्ष्मीरोड, पुणे ४११०३०.

---

प्राप्तिस्थान :
अरगडे आणि मंडळी
बुकसेलर्स
अप्पा बळवंत चौक, पुणे ४११०३०.

# पार्श्वभूमी

महाराष्ट्रात परकीय सत्तेच्या जुलुमाची काळोखी रात्र पसरली असतांना, श्रीशिवरायांच्या रूपाने स्वतंत्रतेच्या चन्द्राची पहिली चाहूल लागली. कलेकलेनं वाढणाऱ्या चन्द्राप्रमाणे स्वराज्याचं बळ वाढत गेलं. श्रीशिवरायांच्या मुद्रेत म्हटल्याप्रमाणं 'प्रतिपच्चन्द्रलेखेव वर्धिष्णु' होत जाणाऱ्या स्वराज्याच्या आकांक्षांना ६ जून १६७४ रोजी पूर्णावस्था प्राप्त झाली. त्या दिवशी श्रीशिवराय सिंहासनाधीश्वर छत्रपती महाराज झाले. या प्रसंगी महाराजांनी स्वराज्याचा कारभार पाहण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांपैकी आठ जणांची प्रधानपदी नेमणूक केली.

—'प्रधान हेच राज्यलक्षणगृहाचे स्तंभ आहेत' —याची जाण ठेवून छत्रपती महाराजांनी आपली नृपसत्ता अशी विकेंद्रित केली. प्रधान, अमत्या, सचिव, मंत्री, सुमंत, न्यायाधीश, पंडितराव आणि सेनापती असे ते आठ प्रधान असत. फारशी नावे बदलून आता ही नावे रूढ झाली. या सर्वांना बहुमान देण्याच्या दृष्टीने 'पंत' असा शब्द त्या नावांमागे लावला जाऊ लागला. पंतअमात्य, पंतसचीव, याप्रमाणेच 'पेशवा' शब्दाऐवजी प्रचारात आलेल्या 'प्रधान' शब्दाचेही 'पंतप्रधान' असे रूप झाले.

प्रस्तुत संचात आम्ही ज्या आठ व्यक्तींच्या जीवनावरील कादंबरिका प्रसिद्ध करीत आहोत, त्या सर्व व्यक्ती छत्रपतींचे 'पंतप्रधान' पद सांभाळणाऱ्या होत्या.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर थोडाफार गोंधळ झाला. महाराजांचे पुत्र संभाजीराजे आणि राजारामराजे यांच्या कारकीर्दीत दिल्लीकर बादशहा औरंगजेब जातीन दक्षिणेत उतरला होता. त्यानं मराठ्यांना नामशेष करण्याचे प्रयत्न केले पण मराठ्यांनीही नेटाने त्याचा हेतू विफल केला. या धामधूमीत शंभूछत्रपतींचा वध झाला, छत्रपतींचे सुपुत्र शिवाजीराजे आणि महाराणी येसूबाई यांना मोगलांच्या कैदेत पडावे लागले. राजारामांनी आणि त्यांच्या मृत्यूनंतर ताराऊ राणीसाहेबांनी मराठ्यांचे नेतृत्व केले. पुढे औरंगजेबच टेकीला आला नी अखेर दक्षिणेतच निधन पावला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शहजादा अजमशहाने बादशाही स्वतःकडे घेतली. आता तो उत्तरेत निघाला. त्यावेळी त्याने कैदेत असलेल्या शंभू पुत्राची (शाहूची) सुटका केली. शाहूमहाराजांना सोडल्याने मराठ्यांत दुफळी माजेल हा अजमशहाचा डाव होता. थोडेफार तसे झालेही. पण लवकरच साताऱ्याच्या गादीवर छत्रपती शाहूराजे स्थिर झाले. शाहूछत्रपतींच्या काळात बाळाजी विश्वनाथ यांच्याकडे पंतप्रधानपद आले. ते पुढे त्यांचे सुपुत्र बाजीरावसाहेब आणि नंतर बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांच्याकडे आले.

नानासाहेबांच्या वेळेपर्यंत भारतभर मराठ्यांचा चांगलाच दरारा निर्माण झालेला होता. परंतु त्यांच्याच कारकीर्दीत पानिपतचा पराभवी धक्का मराठेशाहीला बसला. नानासाहेब देवाघरी गेले. त्यांचे सुपुत्र थोरले माधवराव यांनी तडफेने कार्य करून पुन्हा मराठ्यांचा पराक्रम आणि दौलतीची शान उंचावली. परंतु अल्पवयातच त्यांचे निधन झाले. त्यावर त्यांचे बंधू नारायणराव पंतप्रधानपदी आले. त्यांचा भरदिवसा शनिवारवाड्यात वध झाला. मग मोठ्या कौशल्याने कारभारी मंडळींनी कारस्थान उभे केले. कारण,

नारायणरावांच्या मृत्यूच्या वेळी त्यांच्या पत्नी गंगाबाई गरोदर होत्या. कारभाऱ्यांनी मोठ्या बंदोबस्ताने बाईंना पुरंदर गडावर ठेवले. योग्य वेळी त्यांना पुत्र झाला. त्याचे सवाई माधवराव असे नाव ठेवण्यात आले.

साताऱ्याच्या छत्रपतींनी चाळीस दिवसांच्या वयातच सवाई माधवरावांस 'पंतप्रधान' पदाची वस्त्रे दिली. सवाई माधवरावांच्या पुढील रोमहर्षक जीवनाची माहिती या पुस्तकात आपणास वाचायला मिळेल.

१५ ऑगस्ट, १९७७
१९/२७७, लोकमान्यनगर,
पुणे ३०.

दा. क्र. 2280 22.7.98
विषय कथा

## : १ :

पुरंदर गडावरून येणारी बातमी ऐकण्यास अवघे स्वराज्य अधीर झाले होते. गडावरील राजवाड्यात श्रीमंत गंगाबाईसाहेब पेशवे प्रसूती वेदनांनी विव्हळत होत्या. त्यांना पुत्र होणार की कन्या होणार इकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

गंगाबाईंना जर कन्या झाली तर बारभाईंचे सारे कारस्थानच कोसळून पडणार होते. पण गंगाबाईंना जर पुत्ररत्नाचा लाभ झाला, तर श्रीमंत रघुनाथराव पेशव्यांचे सारे मनोरथ धुळीला मिळणार होते.

गडावर खाशी मंडळी हजर होती. पेशव्यांच्या घराण्यातील श्रीमंत पार्वतीबाई आणि श्रीमंत रघुनाथरावांची कन्या दुर्गाबाई या दोघी गडावर होत्या. त्याचप्रमाणे साताऱ्च्या छत्रपती महाराजांकडून दोन प्रौढ स्त्रिया आणि हुजरेही गडावर पाठविण्यात आले होते. स्वराज्याचे कारभारी आणि बारभाईंच्या कारस्थानाचे सूत्रधार सखारामबापू बोकील आणि नाना फडणीसही गडावर जातीने हजर होते.

कोणत्याही प्रकारचा दगाफटका होऊ नये, याकरता गडावर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ज्योतिषी आणि वैद्य याखेरीज बाहेरच्या दुसऱ्या कोणालाही गडावर प्रवेश नव्हता.

राजवाड्यालगतच्या मसलतखान्यात बापू, नाना आणि इतर मुत्सद्दी यांची बैठक भरली होती, राजकारणाबाबत चर्चा सुरू होती.

बापू म्हणाले, "नाना, श्रीमंत रघुनाथरावांच्या हालचालींना पायबंद घालण्याकरता, हरिपंत फडके यांचेकडे अधिक फौज पाठविली पाहिजे."

"होय बापू, तुमचं म्हणणं खरं आहे." नाना उत्तरले.

पण नानांचे सारे लक्ष राजवाड्यातून येणाऱ्या बातमीकडे लागले होते. नानांना वाटले. श्रीमंत गंगाबाईसाहेबांना पुत्र झाला, तर रघुनाथरावांचे निम्मे बळ कमी होईल !

नानांनी महादेवशास्त्री जोशी यांना बोलावणे पाठविले. महादेवशास्त्री येताच नानांनी अधीरपणे विचारले,

"शास्त्रीबुवा, तुम्ही ज्योतिष नीट पाहिलं आहे ना ? पुत्रलाभ होण्याचा संभव आहे ना ?"

"संभव नव्हे खात्री आहे." महादेवशास्त्री आपले उपरणे सावरीत म्हणाले, "आमचं ज्योतिष कधीही खोटं ठरलेलं नाही. श्रीमंत गंगाबाईसाहेबांना मुलगाच होणार, याबद्दल माझ्या मनात जरासुद्धा शंका नाही. पण नाना, माझं भविष्य खरं ठरलं तर जमीन इनाम घेईन."

"अवश्य. त्याबद्दल तुम्ही निश्चिंत राहा. पुत्र झाला म्हणजे तुम्हाला जमीन इनाम मिळाली असेच समजा."

नानांचे बोलणे ऐकून महादेवशास्त्र्यांनी खुषीत मान डोलाविली. मसलतखान्यात विलक्षण शांतता पसरली. कोणाला काही सुचेनासे झाले. छत्रपती महाराजांची एकनिष्ठपणे सेवा करणारा, स्वराज्याचे रक्षण करणारा पराक्रमी पेशवा जन्माला यावा, अशी प्रत्येकजण मनोमन प्रार्थना करू लागला ! !

आणि सर्वांची प्रार्थना परमेश्वराने ऐकली. दुर्गाबाई धावत धावत मसलतखान्यात येऊन म्हणाली, " नाना-बापू वहिनी-साहेबांना पुत्र झाला. "

दुर्गाबाईचे शब्द ऐकताच सर्वांना अमृतवृष्टी झाल्यासारखे वाटले.

नाना हात जोडून म्हणाले. " श्रीगजाननानं कृपा केली. " आपले आनंदाश्रू आवरीत बापू म्हणाले, " श्रीमायभवानीनं स्वराज्याचं रक्षण केलं. "

नानांचे लक्ष महादेवशास्त्र्यांकडे गेले. ओंजळ भरून सोन्याची नाणी महादेवशास्त्र्यांचे हाती देत नाना म्हणाले,

"शास्त्रीबुवा, तुमचं शास्त्रज्ञान धन्य झालं. जमिनीची सनद तुम्हाला लवकरच देण्यात येईल. "

पुरंदर गडावरील देवदेवतांपुढे साखर ठेवण्यात आली.

पुत्राचे मुख पाहून गंगाबाईंना विलक्षण आनंद झाला. त्यांना वाटले, " आज स्वामी असते तर ! " गंगाबाईच्या अंगाला कंप सुटला, त्यांच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले.

गंगाबाईच्या मस्तकावर हात ठेवून पार्वतीबाई म्हणाल्या, " सूनबाई, आता रडायचं नाही. पेशव्यांच्या वंशाचा हा अंकूर वाढविण्याची जबाबदारी तुझ्यावर आहे. "

गंगाबाईंनी आपले अश्रू आवरले बाळाला एका हाताने थोपटीत त्या म्हणाल्या, " सासूबाई... "

" काय सूनबाई ? "

" ही येसूबाई सुईण मोठी कुशल आणि मायाळू आहे. तिला चार पदरी सोन्याचा गोफ द्या. "

" ठीक आहे, मी करत्ये ती व्यवस्था. "

नाना आणि बापू फडावर आले. नाना बापूंना म्हणाले, " छत्रपती महाराजांना आणि मातोश्री गोपिकाबाईसाहेबांना ही सुवार्ता आताच कळवू या. "

छत्रपती महाराज आणि मातोश्री गोपिकाबाई यांचेकडे सांडणीस्वार तावडतोब रवाना करण्यात आले.

कारकुनांच्या लेखण्या झरझर मजकूर लिहू लागल्या. शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, हरिपंत फडके, पटवर्धन यांना पुत्रजन्माची बातमी कळविण्यात आली.

नवस फेडण्याच्या याद्या तत्परतेने करण्यात येऊ लागल्या. त्या याद्या कारकून नाना-बापूंना वाचून दाखवू लागले, "जेजुरीचा खंडोबा-पंचवीस हजारांचा चांदीचा जोड, चांदीचे छत्र, चांदीच्या शाळुंका आणि घंगाळे ... "

श्रीशंभुमहादेव, तुळजापूरची श्रीभवानी, कोल्हापूरची श्रीमहालक्ष्मी, ठिकठिकाणचे गणपती, गिरीचा व्यंकोबा, शेखसल्ला, शेखसाद, बाबदेव, श्रीत्र्यंबकेश्वर, सप्तशृंगीची भवानी यासारख्या देवदेवतांना बहुमोल आहेर पाठविण्यात आले.

पुत्र-जन्मोत्सवाची तयारी गडावर मोठ्या उत्साहात सुरू

झाली. बारशाचा दिवस उजाडला. हिऱ्यामोत्यांच्या अलंकारांनी बाळाला नटविण्यात आले. सुवासिनींनी गड गजबजून गेला. "बाळाचं नाव काय ठेवायचं ?" याबद्दल चर्चा सुरू झाली. तेव्हा पार्वतीबाई म्हणाल्या, "या बाळाच्या रूपानं, माधवरावानंच पुन्हा जन्म घेतला आहे. म्हणून याचं नाव माधव ठेवा."

बाळाला पाळण्यात घालण्यात आले. सवाई माधवराव हे नाव जाहीर झाले. मंगलवाद्ये वाजू लागली. गडागडावरून तोफांची सरबत्ती झाली. हत्तीवर लादलेली साखरेची पोती रिकामी होऊ लागली. अन्नसंतर्पणामुळे गोरगरीब संतुष्ट झाले.

सवाई माधवरावांना पेशवेपदाची वस्त्रे देण्याबाबत बोलणी सुरू झाली. नाना बापूंना म्हणाले, "तुम्ही स्वत:च सातारला जाऊन छत्रपती महाराजांकडून वस्त्रं आणि आशीर्वाद घेऊन या."

बापू सातारला गेले. छत्रपती महाराजांनी बाळाचे क्षेमकुशल विचारले आणि पेशवेपदाची वस्त्रे बापूंच्या स्वाधीन केली.

बापू पुरंदर गडावर दाखल झाले. वस्त्रे ग्रहण करण्याच्या समारंभाची तयारी थाटात सुरू झाली. बापू नानांना म्हणाले,

"या साऱ्या समारंभात मला एक उणीव तीव्रतेनं जाणवते आहे."

"ती कोणती ?"

"ती म्हणजे, न्यायमूर्ती रामशास्त्र्यांच्या गैरहजेरीची ! श्रीमंत नारायणरावसाहेबांचा खून झाला आणि शास्त्रीबुवा पुण्यातून निघून गेले. त्यांना परत बोलाविलं पाहिजे."

"अवश्य."

रामशास्त्र्यांना आग्रहाचे बोलावणे पाठविण्यात आले. रामशास्त्री गडावर हजर झाले. गडावरील उत्साही वातावरणात चंदनाचा सुगंध पसरला.

पेशवेपदाची वस्त्रे ग्रहण करण्याचा दिवस उजाडला. स्वराज्याचा भगवा झेंडा आणि जरीपटका पुरंदर गडावर दिमाखाने फडकू लागला.

धार्मिक विधी यथासांग पार पडले. छत्रपतींकडून आलेल्या पेशवेपदाच्या वस्त्रांना वंदन करून, रामशास्त्र्यांनी ती सवाई-माधवरावांना अर्पण केली. मग सर्वांनी श्रीमंतांना मुजरे केले.

आपल्या वयाच्या अवघ्या चाळिसाव्या दिवशी, श्रीमंत सवाई माधवराव हे छत्रपती महाराजांच्या स्वराज्याची सेवा करण्यास सिद्ध झाले.

## : २ :

बाळ सवाईमाधवराव मोठे होऊ लागले. सर्वजण श्रीमंतांना जिवाच्या पलीकडे जपू लागले.

पावसाळा सुरू झाला. पुरंदर गडावर विलक्षण गारवा पसरला

नित्याप्रमाणे नाना आणि बापू श्रीमंतांच्या दर्शनाला गेले. श्रीमंत सवाई माधवराव गंगाबाईंच्या मांडीवर होते. त्यांना सारख्या शिंका येत होत्या.

नानांनी काळजीच्या सुरात विचारले, "श्रीमंतांची तब्येत बरी आहे ना ?"

"पहाटेपासून शिंकत आहेत, पण ताप वगैरे काही नाही." गंगाबाई बाळाचे जावळ सारखे करीत म्हणाल्या.

बापू म्हणाले, "नाना, मला वाटतं पावसाळ्यात श्रीमंतांनी गडावर न राहता, सासवड येथे राहावं."

बापूंचा हा विचार सर्वांना पटला. गंगाबाई आणि श्रीमंत यांच्याकरता सासवड येथे राहण्याची उत्तम सोय करण्यात आली. राजवैद्य श्रीमंतांच्या प्रकृतीची काळजी घेऊ लागले.

श्रीमंत सवाईमाधवरावांच्या नावाने कारभार सुरू झाल्यामुळे, रघुनाथरावांची बाजू लंगडी पडली. तरी देखील रघुनाथरावांच्या बाजूच्या लोकांनी, आपली कारस्थानी वृत्ती सोडली नाही. नानांचे चुलतबंधू मोरोबा हे रघुनाथरावांच्या बाजूचे होते. ते नानांचा पाडाव करण्याची संधी पाहू लागले.

झिमझिम पाऊस पडत होता. श्रीमंतांच्या अंगाभोवती ऊबदार वस्त्र गुंडाळून, गंगाबाईंनी त्यांना कडेवर घेतले होते. एवढ्यात नाना येऊन मुजरा करून म्हणाले, "बाईसाहेब, आपल्याला ताबडतोब गडावर गेलं पाहिजे."

"का ? काय झालं ?"

"मोरोबांनी आपणा सर्वांनाच गिरफदार करण्याचा घाट घातला आहे. माझ्या हेरांनी आताच मला ही बातमी सांगितली."

"ठीक आहे. आम्ही तयार आहोत." गंगाबाई म्हणाल्या.

त्वरेने मेणे पालख्या आणण्यात आल्या. बापूंची पालखी पुढे झाली. त्यामागून गंगाबाई आणि श्रीमंत यांचा मेणा निघाला. नंतर नानांची पालखी हलली. हत्यारबंद शिपाई मोठ्या दक्षतेने बरोबर चालू लागले.

सर्व मंडळी गडावर सुखरूप पोहचली. पाऊस थांबला, पण नानांच्या मनातील चिंता वाढली.

आपले एक कारस्थान फसले, म्हणून मोरोबा निराश झाले नाहीत. त्यांनी पुरंदरच्या गडकऱ्यांनाच फितूर करण्याचा प्रयत्न केला. पण गडकरी बेइमान झाले नाहीत. त्यांनी ती बातमी नानांना कळविली. तेव्हा कटाचा बीमोड करण्यात आला. पण श्रीमंतांच्या

रक्षणाबद्दल नानांना जास्तच काळजी वाटू लागली. नाना म्हणाले, "बापू, आपण नेहमी राजकारणाच्या व्यापात मग्न असणार म्हणून श्रीमंतांच्या रक्षणाची काहीतरी स्वतंत्र व्यवस्था केली पाहिजे."

नानांचा हा विचार बापूंना पटला. श्रीमंतांच्या रक्षणाची खास जबाबदारी कोणावर सोपवावी याबद्दल विचारविनिमय सुरू झाला. अखेर ही जबाबदारी पटवर्धन घराण्यातील पुरुषोत्तमराव ऊर्फ दाजी यांचेवर सोपविण्यात आली. कारण दाजी हे निःस्पृह, विश्वासू, मर्द आणि प्रामाणिक सेवक होते.

ढालतलवार घेऊन दाजी बालपेशव्यांच्या महालाच्या दारातच झोपू लागले.

गडावरील पहारे नित्य पाहण्याचा दाजींचा सराव होता. दाजी नुकतेच पहाऱ्यांची तपासणी करून आले होते. नित्याच्या माणसांचा राबता सुरू होता. एवढ्यात एक नेहमीची दासी घाईने दरवाज्यातून आत जाऊ लागली. दाजींना तिचा संशय आला. दाजी कडाडले, "थांब, आत जाऊ नको."

दासी थरथरत जागच्याजागी उभी राहिली. दुसऱ्या दासींना बोलावून तिची झडती घेण्यात आली. तेव्हा तिच्या केसात लपविलेले सुरीचे लवलवते पाते सापडले. दाजींना आलेला संशय खरा ठरला ! त्या दासीला कडक शिक्षा फर्माविण्यात आली.

गंगाबाई आणि पार्वतीबाई श्रीमंतांना खेळवीत होत्या. अशा वेळी नाना तेथे येऊन म्हणाले, "बाईसाहेब, एक बातमी आहे. श्रीमंत रघुनाथरावांच्या पत्नी आनंदीबाई या धार येथे प्रसूत झाल्या. मुलगा झाला. मुलाचं नाव बाजीराव ठेवण्यात आलं."

"वा, छान," गंगाबाई निरागसपणे म्हणाल्या, "चिरंजीव बाजीरावांना आमच्यातर्फे सोन्याची कडी पाठवा आणि आमच्या बाळाची खुशालीही आनंदीबाईंना कळवा."

गंगाबाईंचे हे बोलणे ऐकून नानांना विस्मयाचा धक्का बसला. नानांना वाटले, श्रीमंत नारायणरावांच्या खुनाला कारणीभूत झालेल्या रघुनाथरावांजवळ आणि आनंदीबाईंजवळ गंगाबाईंनी कोणतेच संबंध ठेवू नयेत ! पण नानांनी आपले विचार मनातच ठेवले. "जशी आपली आज्ञा" असे म्हणून नाना निघून गेले.

इंग्रज आणि मराठे यांच्यामध्ये समेटाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. इंग्रजांचा वकील कर्नल अप्टन याने नानांना निरोप पाठविला, "श्रीमंतांना समक्ष पाहण्याकरता आम्ही येत आहो."

यावेळी श्रीमंतांचे वय फक्त दीड वर्षांचे होते. त्यामुळे इंग्रजांचे चित्रविचित्र पोषाख पाहून, श्रीमंत बिचकून जाण्याचा संभव होता. म्हणून एक युक्ती करण्यात आली. श्रीमंतांच्या दिमतीला काही दिवस इंग्रजांसारखा पोषाख केलेली माणसे ठेवण्यात आली. त्याचा इष्ट परिणाम झाला. पागोट्यावरील शिरपेच सावरीत, दाजींच्या मांडीवर विराजमान होऊन, श्रीमंतांनी निर्भयपणे इंग्रज वकिलाची भेट घेतली. कारभाऱ्यांजवळ "पुरंदरचा तह" करून इंग्रज वकील निघून गेला.

श्रीमंतांचे सर्वजण कौतुक करू लागले. दक्षिणेत आलेल्या, होळकर आणि शिंदे यांनी, त्याचप्रमाणे इतर सरदारांनीही श्रीमंतांच्या दरबारी भेटी घेतल्या.

श्रीमंत गंगाबाई दाजींना आपल्या भावाप्रमाणे मानीत

असत. दाजीची सर्वात धाकटी मुलगी बया ही सहासात महिन्यांची होती. बया फार सुंदर होती. एकदा श्रीमंत सोन्याच्या फुलपात्रातून दूध पीत असताना, दाजी तेथे आले. त्यांच्या कडेवर बया होती. बयेला आपल्या हाती घेत गंगाबाई म्हणाल्या. "दाजी, तुमची ही गोजरी आमचे बाळास करावयाची. जोडा चांगला शोभेल."

त्यावर हात जोडून दाजी उत्तरले, "बाईसाहेब, आम्ही आपल्या पदरचे चाकर! आमची योग्यता मुलगी द्यावयाची आहे की काय? या मुलीस श्रीमंतांचं उरलेलं दूध द्यावं, म्हणजे आम्ही धन्य होऊ. तेवढीच आमची योग्यता."

गंगाबाईंनी झटकन बयेला पायांवर घेऊन, सोन्याची दुधाची वाटी आणि सोन्याचे बोंडले हाती घेतले. ते पाहून श्रीमंत म्हणाले, "दूध पाजणे" आणि सर्व मंडळी हसू लागली.

अशा सुखद कौटुंबिक वातावरणात श्रीमंत वाढत होते. नाना आणि बापू मध्येच सासवड आणि पुणे येथे जाऊन राजकारणाचे पेच उलगडू लागले. श्रीमंत गंगाबाई पुरंदर गडाचा कारभार पाहू लागल्या.

एक दिवस गंगाबाई सकाळच्या उठल्या तेव्हा त्यांना तापाची कसर जाणवली. संध्याकाळपर्यंत ताप खूप वाढला. थंडी तापाने त्यांना बेजार केले. राजवैद्यांनी उपचार सुरू केले, पण ताप हटेना.

गंगाबाई पार्वतीबाईंना सांगू लागल्या, "बाळाला माझ्या जवळ आणू नका. माझा ताप त्याला लागेल."

गंगाबाईंचे दु:खणे नवज्वरावर गेले. आपण या आजारातून

वाचत नाही. असे त्यांना वाटू लागले. आपल्या मागे बाळाचे कसे होणार, हा घोर त्यांच्या जिवाला लागला.

अंत्य समय जवळ आला. श्रीमंतांचा हात बापूंचे हाती देत, खोल गेलेल्या आवाजात गंगाबाई म्हणाल्या, "बापू आम्ही निघालो. छत्रपती महाराज-महाराणींना आमचा अखेरचा मुजरा सांगा. तुम्ही आणि नाना श्रीमंतांचं आणि दौलतीचं रक्षण करा" मग श्रीमंतांना पार्वतीबाईंचे हाती सोपवीत, गंगाबाई म्हणाल्या, "या पुढं बाळाचे आईबाप तुम्हीच आहात."

पार्वतीबाईंनी डोळ्याला पदर लावला. ईश्वराचे नाव घेत गंगाबाई कैलासवासी झाल्या. पुरंदर गड शोकात बुडाला.

गंगाबाईंच्या निधनाची बातमी, नानांना ताबडतोब पुण्याला कळविण्यात आली. सहसा भावनावश न होणारे नाना भरल्या कंठाने म्हणाले, "मातोश्री गंगाबाईसाहेब गेल्या. आम्हाला आधारभूत वाटणारे श्रीमंत पोरके झाले. यापुढं सारा भार श्रीगजाननावर !"

श्रीमंत गंगाबाईंचे निधन झाल्यामुळे, श्रीमंत सवाई माधवरावांच्या संगोपनाची जबाबदारी पार्वतीबाईंवर पडली.

मातृवियोगाचे दुःख समजण्याइतके श्रीमंत मोठे नव्हते. त्यांना फक्त चौथे वर्ष चालू होते. गंगाबाईंच्या महालात जाऊन श्रीमंत विचारीत, "आईसाहेब कोठे गेल्या ?"

आजूबाजूची माणसे सांगत, "आईसाहेब, आताच देव-दर्शनासाठी गेल्या आहेत."

त्यावर श्रीमंत म्हणत, "आईसाहेबांना लवकर बोलावून

आणा, नाहीतर आम्हाला त्यांचेकडे घेऊन चला."

मग श्रीमंतांची समजूत करताना, सर्वांना पुरेवाट होई. नाना पार्वतीबाईंना म्हणत, "श्रीमंतांबद्दल मला फार काळजी वाटते."

त्यावर पार्वतीबाई सांगत, "नाना, तुम्ही बाहेरचं राजकारण सांभाळा. श्रीमंतांची सारी जबाबदारी आम्ही सांभाळू."

सातारचे छत्रपती महाराज रामराजे हे आजारी झाले. त्यामुळे नाना आणि बापू त्वरेने साताऱ्याला गेले.

छत्रपती रामराजांनी भोसले घराण्यातील वावीकर त्र्यंबकजीराजे यांचे पुत्र विठोजी यांना दत्तक घेतले. दत्तक समारंभाचे वेळी छत्रपती रामराजे म्हणाले, "आम्ही आमच्या पुत्राचं नाव शाहू ठेवतो. यांना धाकटे शाहूमहाराज म्हणत जा."

छत्रपती रामराजांच्या निधनानंतर धाकटे शाहूमहाराज गादीवर आले. त्यांना ताबडतोब राज्याभिषेक व्हावा, अशी सर्वांची इच्छा होती. परंतु राजगुरु म्हणाले, "सध्या सिंहस्थ असल्यामुळं राज्याभिषेक करता येणार नाही. त्याकरता काही दिवस थांबलं पाहिजे."

चांगला मुहूर्त पाहून छत्रपती शाहूमहाराजांची थाटात मुंज करण्यात आली. नंतर महाराजांचा विवाह झाला. दोन्ही कार्ये शाही इतमामात पार पडली.

शाहूमहाराजांच्या राज्याभिषेकाला थोडा अवधी होता. त्याचा फायदा इंग्रजांनी घेण्याचे ठरविले. गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जने, नागपूरच्या मुधोजीराजे भोसल्यांना सातारच्या राजसिंहासनावर बसविण्याचा बेत केला. हेस्टिंग्जला वाटले आपला

हा बेत यशस्वी झाला म्हणजे मराठ्यांचे सारे साम्राज्य आपल्या हाती येईल ! पण मराठ्यांनी हेस्टिंग्जचे कारस्थान उधळून लावले. धाकट्या शाहूमहाराजांना थाटामाटात राज्यभिषेक होऊन, ते साताऱ्याच्या राजसिंहासनावर आरूढ झाले. मराठा साम्राज्याने नव्या छत्रपतींना मानाचा मुजरा केला.

पण इंग्रज स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी मोरोबांना फूस देऊन, नानांच्या विरुद्ध उभे केले. मोरोबांनी पुण्याचा कबजा घेतला. तेव्हा श्रीमंतांना बरोबर घेऊन, नाना पुरंदर गडावर बंदोबस्ताने राहिले.

या वेळी महादजी शिंदे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी सर्व सरदारांना सांगितले, " धनी बाळ आहेत. त्यामुळं सर्व जबाबदारी आपल्यावर आहे. "

महादजींनी मोरोबांचे बंड मोडून काढले. मोरोबांना अटक करण्यात येऊन, त्यांची रवानगी नगरच्या किल्याकडे करण्यात आली.

मोरोबांचा पराभव झाल्यावर; इंग्रजांनी आणि श्रीमंत रघुनाथरावांनी मराठ्यांबरोबर उघड उघड युद्ध सुरू केले. इंग्रजांचा समाचार घेण्याकरता, महादजी शिंदे, तुकोजीराव होळकर, नाना, बापू, हरिपंत फडके पुढे निघाले.

या वेळी श्रीमंत पुरंदर गडावर होते. इंग्रज आणि मराठे यांच्या युद्धात जय कोणाचा होतो, या काळजीत सर्व मंडळी होती. सर्वांचे चेहरे चिंताग्रस्त दिसत होते. तेव्हा श्रीमंतांनी विचारले, " तुम्ही अवघे असे का दिसता ? "

तेव्हा सभोवतालच्या लोकांनी सांगितले, "सरकार, इंग्रजांचा मोड होत नाही, म्हणून सर्वजण दिलगीर आहेत."

"त्यात एवढं दिलगीर होण्याचं काय कारण? इंग्रज मोडत नाही म्हणजे काय?" श्रीमंत खिजमतगाराला म्हणाले, "आमची तलवार आण."

खिजमतगाराने एक छोटीशी तलवार आणून श्रीमंतांचे हाती दिली. ती फिरवून श्रीमंत म्हणाले, "हा पहा इंग्रज मारला."

एवढ्यात मराठ्यांची सरशी झाल्याचे वर्तमान घेऊन, पुण्याहून खास जासूद आले. त्या जासूदांना श्रीमंतांनी आपल्या हातातील सोन्याची कडी बक्षिस दिली. पुरंदर गडावरून तोफांची सरबत्ती करण्यात आली.

इंग्रजांनी आपला पराभव कबूल करून, वडगावच्या तहास मान्यता दिली. श्रीमंत रघुनाथराव हे शिंदे यांच्या गोटात दाखल झाले. त्यांची रवानगी लव्याजम्यासह उत्तरेकडे करण्यात आली. याच वेळी बापू हे रघुनाथरावांना फितूर झाल्याचे सिद्ध झाल्यामुळे, त्यांना कैदेत ठेवण्यात आले.

श्रीमंत सवाई माधवरावांच्या पुण्यप्रतापाने इंग्रजांचा मोड इतक्या त्वरित झाला, अशी लोकांची भावना झाली.

श्रीमंतांच्या दर्शनाकरता पुरंदर गडाकडे, सरदारांची, सैनिकांची आणि लोकांची रीघ लागली. पुरंदर गडाखाली भव्य शामियाना उभारण्यात आला.

श्रीमंतांच्या देखणेपणाची, बोलण्याची, बसण्याची सर्वजण तारीफ करू लागले. "श्रीमंत केवळ ईश्वरस्वरूपी आहेत."

"धन्याचे पाय पाहिले, आनंद झाला" असे उद्गार लोकांच्या तोंडून निघू लागले.

तुकोजीराव होळकर श्रीमंतांचे भेटीकरता आले. तेव्हा दहाबारा बोथाटीचे तीर, दप्तरचे भिंतीस मारून श्रीमंतांनी आपले तिरंदाजीचे कौशल्य दाखविले. त्याचप्रमाणे पुस्तीचे अकरा बंदही श्रीमंतांनी सर्वांस दाखविले.

वसंत पंचमीचे दिवशी रघुनाथराव पटवर्धन श्रीमंतांचे दर्शनास आले. तेव्हा श्रीमंत म्हणाले, "आम्ही तुम्हाला कारंजाची चादर दाखवितो."

श्रीमंतांनी खिजमतगाराला सांगून, पावसापेक्षाही अधिक मजेदार दिसणारी कारंजाची सर सोडविली. नंतर श्रीमंतांनी केशरी रंग आणून सर्वांचे अंगावर उडविला आणि आपलेही अंगावर उडवून घेतला. दोन घटका गाणे झाल्यावर, विडे आणि फुले देऊन श्रीमंतांनी सर्वांना निरोप दिला.

श्रीमंतांच्या बाललीला पाहून, सर्वजण संतुष्ट होऊ लागले. महादजी शिंदे नानांना म्हणाले, "श्रीमंतांनी आता शनिवार-वाड्यात राहावयास जावं हे चांगलं."

"पाटिलबाबा, आपला विचार योग्य आहे. पण पूर्वी नवस केल्याप्रमाणं श्रीमंतांची मुंज पर्वतीवर करून, मगच श्रीमंत शनिवारवाड्यात जातील."

"उत्तम. पण नाना, आम्ही आणि होळकर दक्षिणेत आहोत, तोच श्रीमंतांची मुंज करून घ्या, म्हणजे आम्हालाही त्या

समारंभाला हजर राहता येईल. "

मुंजीचा मुहूर्त निश्चित करण्यात आला. पर्वतीच्या परिसरात भव्य मांडव आणि शामियाने उभारण्यात आले. मुंजीची तयारी जोरात सुरू झाली.

चैत्रअखेर सुमुहूर्तावर श्रीमंतांची स्वारी लव्याजम्यासह पुरंदर गडावरून निघाली. जेजुरी, मोरेश्वर, थेऊर येथे देवदर्शन करून श्रीमंत पर्वतीवर दाखल झाले.

वैशाख शुद्ध पंचमीचा दिवस उजाडला. पर्वतीवरील मंगल वाद्यांच्या निनादाने पुण्याचा परिसर भारून गेला.

श्रीमंतांचे स्नान झाले आणि त्यांना रडूच कोसळले. पार्वतीबाईंनी विचारले, " माधवराव, काय झालं ? "

स्फुंदत स्फुंदत श्रीमंत म्हणाले, " आईसाहेबांची आठवण झाली. "

मग श्रीमंतांच्या पाठीवरून हात फिरवून, पार्वतीबाईंनी त्यांचे सांत्वन केले.

मुंजीचा मुहूर्त जवळ आला. चांदीच्या घंगाळात घटिकापात्र तरंगू लागले.

महादजी शिंदे, तुकोजीराव होळकर, रामशास्त्री, निंबाळकर, घोरपडे, रास्ते, फडके, पटवर्धन शामियान्यात दाखल झाले. नाना फडणीस जातीने सर्व व्यवस्था पाहू लागले.

घटिकापात्र बुडाले आणि वाद्यांचा एकच कडकडाट झाला मुंज दणक्यात पार पडली. श्रीमंतांना बहुमोल अहेर देण्यात आले.

वैशाख शुद्ध एकादशीची रात्र आली. श्रीमंतांनी देवदर्शन

घेतले. पर्वतीवरील थोरल्या शाहूमहाराजांच्या पादुकांवर फुले वाहिली. श्रीमंतांची स्वारी वाजत गाजत पर्वतीवरून निघाली. पर्वतीच्या अगदी खालच्या पायरीपर्यंत दीपमाळा लावण्यात आल्या.

ठरलेल्या मुहूर्तावर मध्यरात्री श्रीमंत शनिवारवाड्याजवळ आले. श्रीमंतांवरून भाताच्या पाट्या ओवाळून टाकल्यावर श्रीमंतांनी दिल्ली दरवाज्यातून शनिवारवाड्यात प्रवेश केला. नौबतखान्यात चौघडा दणाणू लागला. शनिवारवाड्यावरील भगव्या झेंड्याची मान ताठ झाली.

शनिवारवाड्याची ती भव्य वास्तू श्रीमंत प्रथमच पाहात होते. पोषाख बदलून श्रीमंत मोठ्या देवघरात गेले. चांदीच्या उंच समयांच्या प्रकाशात आणि पुष्पांच्या सुगंधात श्रीमंतांनी देवांना नमस्कार केला.

शुभ्र दरबारी पोशाख करून, श्रीमंत नानांबरोबर गणेश महालाकडे निघाले. भालदार चोपदारांनी ललकारी दिली.

" ब–आदब बा मुलाहिजा हो ऽ श्शीऽयाऽऽर निगा रखो..."

सर्वांच्या नजरा श्रीमंतांकडे वळून, माना खाली झुकल्या. रामशास्त्री पुढे झाले. त्यांनी श्रीमंतांच्या चिमुकल्या हाताभोवती मोगऱ्याचा गजरा गुंडाळला.

नानांनी श्रीमंतांच्या कानात काही सांगितले. मग गणेश-महालातील श्रीगजाननाच्या भव्य मूर्तीला वंदन करून श्रीमंत सवाई माधवराव पेशवे, जरतारी मसनदीवर विराजमान झाले.

नाना, महादजी शिंदे आणि तुकोजीराव होळकर यांनी पेशव्यांना प्रथम मुजरे केले. नंतर इतमामाप्रमाणे मंडळी मुजऱ्या-

करिता पुढे होऊ लागली. मुजऱ्यांचा स्वीकार करताना, श्रीमंतांच्या मस्तकावरील हिरेजडित शिरपेच हलू लागला.

शनिवारवाडा रोषणाईने झगमगू लागला. दसरा दिवाळीचा आनंद शनिवारवाड्यावर चांदण्यासारखा पसरला. त्या दिवशी शनिवारवाड्यातील राबता अगदी सकाळपर्यंत सुरू होता.

※ ※

शाखा.
क्र. २२६०
विषय

## : ३ :

श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे शनिवारवाड्यात राहावयास आल्यामुळे, वाड्यातील पहारे वाढविण्यात आले. पुण्यातील बंदोवस्तही कडक करण्यात आला. नानांनी घाशीराम कोतवाल यांना बजावून सांगितले, "बंदोबस्तात जराही ढिलाई होता कामा नये. काही विपरीत प्रकार घडल्यास, गर्दन मारली जाईल हे लक्षात ठेवा."

श्रीमंतांच्या दिमतीला विश्वासू सेवक देण्यात आले. महादजी बल्लाळ गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली श्रीमंतांचा विद्याभ्यास सुरू झाला. श्रीमंतांच्या आवडीनिवडी पार्वतीबाई लक्षात घेऊ लागल्या.

श्रीमंतांच्या वयाची घरंदाज मुले वाड्यात येतील, अशी व्यवस्था नानांनी केली. आपल्या मित्रमंडळींजवळ खेळण्यात श्रीमंत रमू लागले. शनिवारवाड्याच्या चौकाचौकात श्रीमंतांचे खेळ सुरू झाले. वाड्यातील हजार कमळांचे कारंजे आनंदाने थुई थुई नाचू लागले.

नानांनी शनिवारवाड्यातील यंदाचा गणेशोत्सव मोठ्या थाटात साजरा करण्याचे ठरविले. गुणिजनांना आमंत्रणे गेली. "श्री" करता भव्य मखर तयार करण्यात आले.

"श्री" च्या आगमनापासून प्रत्येक कार्यक्रमात श्रीमंतांनी भाग घेतला. कथाकीर्तन ऐकण्यास श्रीमंत उत्साहाने बसू लागले. भव्य आरास, सुगंधाचा घमघमाट, वेदमंत्रांचा जयघोष आणि मधुर प्रसादाची लयलूट, त्यामुळे वाड्यात एक वेगळेच वातावरण निर्माण झाले. गणपतीविसर्जनाची मिरवणूक वैभवात निघाली. राजहंस हत्तीवर जरीपटका दिमाखाने फडकू लागला. नौबती दणाणू लागल्या या मिरवणुकीत श्रीमंत पालखीतून गेले.

शनिवारवाड्यात वाढणाऱ्या श्रीमंतांकडे अवघ्या स्वराज्याचे लक्ष होते. श्रीमंतांकरता अनेक प्रकारच्या अलौकिक वस्तू सरदार दरकदार पाठवू लागले. देवी अहिल्याबाई होळकर यांनी श्रीमंतांकरता मेवा, डाळिंब आणि बेदाणा; मोहोर केलेल्या डालग्यातून पाठविला.

आपल्या सवंगड्यांवर श्रीमंत मनस्वी प्रेम करू लागले. वाड्यात श्रीमंतांबरोबर खेळावयास येणारा बजाबा आजारी पडला. ही बातमी श्रीमंतांना समजली. तेव्हा नानांजवळ हट्ट धरून श्रीमंत गावात बजाबाच्या घरी गेले. आपल्या घरासमोर शिपाईप्यादे आलेले पाहून, बजाबाच्या घरची माणसे घाबरली. मग पालखीतून खाली उतरून श्रीमंतांनीच सर्व खुलासा केला. प्रत्यक्ष श्रीमंत घरी आल्यामुळे बजाबाचा अर्धा आजार बरा झाला.

बजाबाला औषधोपचार करण्याची श्रीमंतांनी व्यवस्था

केली. बजाबाचे वडील गहिवरून म्हणाले "श्रीमंत आपल्या पायधुळीनं आमचं घर धन्य झालं."

बजाबाच्या आईने श्रीमंतांचे हाती दुधाने भरलेले भांडे दिले. तेव्हा नानांकडे न बघताच श्रीमंतांनी ते दूध प्रेमाने पिऊन टाकले. बजाबाची आई म्हणाली, "श्रीकृष्णानं सुदाम्याच्या घरचे पोहे खाल्ले."

बजाबाच्या वडिलांचे हाती श्रीमंतांनी काही रक्कम ठेवली. पालखीत बसताना श्रीमंत मोठ्यांदा म्हणाले, "बजाबा, लवकर बरा होऊन खेळायला ये."

डोळ्यातील आनंदाश्रू टिपीत, बजाबा श्रीमंतांच्या दूर जाणाऱ्या पालखीकडे पाहात राहिला.

श्रीमंतांचा स्वभाव थोडा थट्टेखोर आणि हट्टीही होऊ लागला. गणेशपंत पेठे यांचा पुतण्या हरी श्रीमंतांकडे येत असे. हरी शरीराने फार स्थूल होता. त्याला श्रीमंत म्हणाले, "तुझ्या शरीरात वायू फार भरला आहे, तो कमी केला पाहिजे. चल, पळायला सुरुवात कर" हरी जाग्यावरच उभा राहिला. तेव्हा श्रीमंत त्याला मनस्वी बोलले. श्रीमंतांनी फारच दुरुत्तरे केल्यामुळे, हरीला अखेर मोठ्या चौकाला धावत प्रदक्षिणा घालाव्या लागल्या.

श्रीमंतांचा हा हेकेखोरपणा नानांना समजला. तेव्हा नाना म्हणाले, "श्रीमंत इतका हट्ट चांगला नाही. शिवाय आमच्या हेही कानावर आलं आहे की, अलीकडे तुमच्या तोंडून अपशब्द फार येतात. श्रीमंत, लोक तुम्हाला नुसतेच पंतप्रधान म्हणत नाहीत, तर प्रधानपंडित म्हणतात, हे लक्षात असू द्या. श्रीमंतांची वाणी

पंडितासारखी असावी, श्रीमंतांनी अपशब्द कधीही उच्चारू नयेत."

नानांच्या या उपदेशामुळे श्रीमंतांच्या तोंडातील अपशब्द कमी झाले, पण त्यांची थट्टा करण्याची वृत्ती काही प्रमाणात कायम राहिली.

श्रीमंतांकडील एक पाणक्या रामभाऊ हा घारागोरा आणि चांगला जाडजूड होता. त्याला पाहून श्रीमंतांना एक कल्पना सुचली. श्रीमंत म्हणाले. "रामभाऊ, तुम्ही इंग्रजांचं सोंग घ्या."

रामभाऊ टाळाटाळ करू लागला, तेव्हा श्रीमंतांनी त्याच्या हातावर काही नाणी ठेवली. तेव्हा रामभाऊ "इंग्रज" व्हायला तयार झाला. जामदारखान्यातून तुमान, कुडती आणि साहेबी टोपी आणून, रामभाऊला इंग्रज बनविण्यात आले. रामभाऊचा तो विचित्र अवतार पाहून, वाडयात जमलेली पोरे टाळ्या वाजवू लागली. स्वत: रामभाऊदेखील हसू लागला.

श्रीमंत रामभाऊकडे टक लावून पाहू लागले. काही उणीवा ध्यानात येऊन श्रीमंत म्हणाले, "रामभाऊ, तुमच्या डोक्याची हजामत केलेली आहे. तुम्ही झुलपं, कल्ले आणि दाढी राखा."

श्रीमंतांनी रामभाऊला दूर उभे केले. नंतर श्रीमंतांनी तीरकामठा हाती घेऊन, बाणाने रामभाऊच्या डोक्यावरील उंच साहेबी टोपी अलगद उडविली. श्रीमंत मोठ्यांदा म्हणाले. "इंग्रजाचा आम्ही पराभव केला."

श्रीमंतांचे वाक्य पुरे होत असतानाच, नाना तेथे आले. नानांना सर्वांनी मुजरे केले. श्रीमंतांना मुजरा करीत नाना म्हणाले,

"श्रीमंत इंग्रजांचं आणि आपलं पुन्हा युद्ध सुरू झालं आहे."

"हरकत नाही" श्रीमंत त्वरेने म्हणाले, "नाना, तुम्ही काही काळजी करू नका. जय आपला होईल."

श्रीमंत आणि नाना मसलखान्यात काही वेळ बसले. नानांनी श्रीमंतांना चालू राजकारणाची थोडी कल्पना दिली.

"वडगावचा तह" इंग्रजांच्या मनाला जाचत होता. तेव्हा इंग्रजांनी मराठ्यांविरुद्ध हिंदुस्थानभर उठाव करण्याचे ठरविले. अशा वेळी इंग्रजांचा उत्साह वाढविणारी आणखी एक घटना घडली. उत्तरेकडे गेलेले श्रीमंत रघुनाथराव हे शिद्यांच्या फौजेला झुकांडी देऊन, पुन्हा गुजराथमध्ये इंग्रजांच्या आश्रयाला आले.

इंग्रजांनी रघुनाथरावांचे हार्दिक स्वागत केले. त्यांचा तनखा वाढविला.

इंग्रज आणि मराठे यांचे युद्ध पुन्हा सुरू झाले. इंग्रजांचा पराभव करण्याकरता नानांनी पेशवे सरकार, निजाम, हैदरअल्ली आणि नागपूरकर भोसले यांचा एक संघ उभारला.

नानांची ही योजना यशस्वी होऊन इंग्रजांना माघार घ्यावी लागली. इंग्रजांनी मराठ्यांजवळ समेट करण्याची इच्छा प्रदर्शित केली. मराठे आणि इंग्रज यांमधील युद्ध तहकूब झाले. तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या.

: ४ :

गंगापूर येथे श्रीमंतांच्या आजी गोपिकाबाई राहात असत. श्रीमंतांची खुशाली आणि प्रगती, नाना गोपिकाबाईसाहेबांना नेहमी कळवीत असत. एक दिवस गोपिकाबाईंचा नानांना निरोप आला, " आता माधवरावांच्या लग्नाचा विचार करावा."

गोपिकाबाईंच्या निरोपाला पार्वतीबाईंनीही दुजोरा दिला. तेव्हा नाना श्रीमंतांच्या लग्नाच्या तयारीला लागले. वधू संशोधन सुरू झाले, बाळाजी बहिरव थत्ते यांची कन्या, श्रीमंतांकरता वधू नेमस्त करण्यात आली.

सारे पुणे विवाहाच्या तयारीत दंग झाले. सुवर्णकार अलंकार घडवू लागले. जडजवाहीर, हिरे, माणके आणि मोती यांनी पेढ्या उजळून निघाल्या. जरी, रेशमी वस्त्रांची आवक मोठ्या प्रमाणात होऊ लागली. भांडेआळीतील घणांची आणि हातोड्यांची ठकठक वाढली. सुगंधाचे साम्राज्य सर्वत्र पसरले. फळाफुलांचे व्यापारी तेजीत आले,

लग्नाच्या आमंत्रण पत्रिका कोणाच्या नावाने काढाव्यात

याबद्दल चर्चा सुरू झाली· तेव्हा रामशास्त्री म्हणाले, " नाना, श्रीमंत पेशव्यांच्या घराण्यातील वडील पुरुष म्हणजे, श्रीमंत रघुनाथराव आहेत. पण ते शत्रूच्या शिबिरात आहेत. तुम्ही फडणीस म्हणजे पेशव्यांचे पिढ्यांचे सेवक आहात. तेव्हा तुमच्या नावानं आमंत्रणपत्रिका काढाव्यात असं मला वाटते."

रामशास्त्रांचा विचार सर्वांनाच पटला. नानांच्या नावाच्या सोनेरी वर्खातील आमंत्रणपत्रिका तयार झाल्या. "श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे लग्नाचा निश्चय माघ शु॥ ९ स जाहला आहे. तरी आपण सहपरिवारे लग्न समारंभास यावयाचे करावे."

आमंत्रणाची पहिली अक्षत, मातोश्री जिजाबाईसाहेबांनी स्थापन केलेल्या कसब्यातील श्रीगजाननापुढे ठेवण्यात आली. नंतर मंगलाक्षता पर्वतीवर गेल्या.

छत्रपती धाकटे शाहूमहाराज यांनी लग्न समारंभाकरता यावे, याकरता खास विनंती करण्यात आली. छत्रपती महाराजांनी आपण समक्ष येत असल्याचे कळविले.

श्रीमंतांच्या आजी यांनी विवाहप्रसंगी हजर राहावे याकरता नानांनी खूप प्रयत्न केले. पण गोपिकाबाईंनी कळविले, "आमचं येणं होणार नाही. आपण विवाह समारंभ इतमामात पार पाडावा."

विवाह समारंभाची आमंत्रणे हिंदुस्थानातील तमाम राजे-रजवाड्यांकडे पाठविण्यात आली. मराठा साम्राज्यातील तमाम सरदारांकडे आमंत्रणे गेली. निजाम आणि टिपू सुलतान यांनाही आमंत्रणे देण्यात आली.

विवाहाचा दिवस जवळ आला. साऱ्या पुण्याला लग्नाचे

आमंत्रण देण्यात आले.

सातान्याहून धाकटे शाहूमहाराज पुण्याला आले. तेव्हा त्यांचे राजेशाही स्वागत करण्यात आले. श्रीमंतांनी छत्रपतींच्या चरणावर मस्तक ठेवले. त्यांना वर उठवीत महाराज म्हणाले, " ऊठा, पंतप्रधान ऊठा. शतायुषी व्हा."

पंतप्रतिनिधी, पंतअमात्य आणि पंतसचीव पुण्याला दाखल झाले. स्वागत प्रत्यक्ष श्रीमंतांनी केले. नऊ वर्षांच्या श्रीमंतांना फार दगदग पडू लागली. मध्येच नाना श्रीमंतांना विचारीत,

"सरकार स्वारी दमली नाही ना ?"

"बिलकुल नाही." श्रीमंत उत्तर देत, " नाना, आम्ही ठीक आहोत."

दोन्हीकडच्या मंडपात देवस्थापना करण्यात आली. त्या दिवसापासून शहरातील लाख घरास सिधे चालू केले. घरातील घरधन्यास, आणखी बिऱ्हाडे होती त्यासुद्धा सर्वांस पंचपक्वान्नांचे सिधे चालू झाले. शहराबाहेर उतरलेल्या लष्करालाही सरंजाम पोचते होऊ लागले.

अहेराचे समारंभ सुरू झाल्यावर, किंमती अहेरांनी दालने भरून गेली.

श्रीमंतपूजनाचे वेळी तमाम आमंत्रित जमा झाले. छत्रपती महाराजांकरता रत्नजडित राजसिंहासन मुद्दाम तयार करण्यात आले होते. त्यावर महाराज विराजमान झाले.

या प्रसंगी पन्नास काठी सोन्याची उभी राहिली. रुप्याच्या काठीवाल्यांची तर गणतीच नव्हती. सनईच्या मंगल नादाने

वातावरण भारून गेले. वाजंत्री वाजू लागली. चौघडयांचा नाद घुमू लागला. साजिद्यांच्या तालावर नर्तिकांच्या पावलांनी भिंगरीची गती घेतली.

नानांनी सगळीकडे नजर टाकून, दोघा शिलेदार कारकूनांना जवळ बोलावून सांगितले, "तुम्ही आरसेमहालात जाऊन मोरोपंत भावे यांना सांगा की, छत्रपती महाराज तख्तावर येऊन बसले आहेत. सर्व मंडळीही आली आहे. थत्ते यांजकडील लोक श्रीमंत-पूजनविधी घेऊन बसले आहेत. तरी श्रीमंतांस विनती करून, लवकर घेऊन यावं.

मोरोपंत भावे यांनी नानांचा निरोप सांगून, श्रीमंतांना निघण्याची विनंती केली.

विनंती ऐकताच श्रीमंतांची स्वारी उठली. श्रीमंतांनी तमामी पोषाख केला होता. पायात विजार, अंगात निमा, डोक्यावर जरीचा फेटा, त्यावर शिरपेच, कलगी आणि मोत्याचा तुरा, कानामध्ये चौकडा, गळयात मोत्याच्या आणि पाचेच्या माळा, हातात पोच्या असा श्रीमंतांचा थाट होता. श्रीमंत आरसे महालाबाहेर पडणार, एवढयात पार्वतीबाईंनी त्यांच्या डोळयात काजळ घालून, गालावर तीट रेखली.

श्रीमंत सभास्थानी येताच, छत्रपती महाराजांखेरीज बाकी सर्व मंडळी उभी राहिली. श्रीमंतांच्या हातावरून ताज्या फुलांचा हार गुंडाळण्यात आला.

श्रीमंत राजसिंहासनासमोर जाऊन उभे राहिले. श्रीमंतांनी छत्रपतींना मुजरा केला. महाराज म्हणाले, " बसा."

छत्रपती महाराजांचे उजवे बाजूस श्रीमंत, तख्तानजीक बसले. श्रीमंतपूजनविधी पार पडला. शास्त्रीपंडितांना देकार वाटण्यात आला. मानकऱ्यांना अत्तरगुलाब आणि हारतुरे देण्यात आले.

छत्रपतीमहाराज उठून म्हणाले, "आम्ही येतो" छत्रपतींना निरोप देण्याकरता श्रीमंत, नाना आणि रामशास्त्री निघाले. दरवाज्याजवळ जाताच छत्रपती महाराज म्हणाले, "प्रधानपंडित, तुम्ही आता माघारी जा."

छत्रपती गेल्यावर इतर सरदार आणि पाहुणे श्रीमंतांची आज्ञा घेऊन निघून गेले.

दुसरे दिवशी तेलफळ नवरीकडे सरकारातून गेले. तेलफळ माघारे येऊन, थत्ते यांजकडून रुखवत सरकारात आले. रुखवताचा समारंभ होत असतानाच, वराला न्यावयाला थत्ते यांजकडील मानकरी आले.

वरप्रस्थानाची सिद्धता झाली. देवांस नमस्कार करून, श्रीमंतांची स्वारी बाहेर निघाली. थोरला हत्ती विनायक गज रत्नजडित अंबारी लादून बाहेर सिद्ध होता.

माहूताने हत्ती खाली बसवताच, श्रीमंत अंबारीत बसले. पाठीमागे खवासखान्यात अप्पा बळवंत आणि अमृतराव पेठे हाती चवऱ्या घेऊन बसले.

माहूताने इशारा करताच, सुवर्णालंकारांनी नटलेला विनायक गज डौलात चालू लागला. खास जिलबीस बोथाटीबहाद्दर,

विटेदार, बाणदार आणि खासबदार चालू लागले. वाजंत्र्याचे ताफे आणि चौघडे दोनशे वाजू लागले. जरीपटक्याच्या हत्तीसह शेपन्नास हत्ती पुढे चालले. मागून कोतवाल घोडे पाचसातशे; सोन्याचे गंडेपटचे पाठीवर भरगच्ची झुली, गळचात मोहरा पुतळचांच्या माळा, अशा थाटात चालले.

साहेबनौबती वाजू लागल्या. श्रीमंतांच्या अंबारीमागून हिऱ्यामोत्यांचे अलंकार धारण केलेल्या वऱ्हाडिणी निघाल्या. स्त्रियांमध्ये पुरुषांची दाटी न होईल, अशा बेताने सभोवती सैनिक चालू लागले. त्यामागून जरी रेशमी वस्त्रांनी नटलेले वऱ्हाडी आणि मानकरी निघाले. उंटावरील शतावधी नौबती वाजू लागल्या.

श्रीमंतांची स्वारी समारंभाने नवरीचे मंडपाशी आली. तेथे जलकुंभ मस्तकी घेऊन दासी उभ्या होत्या. दासींना देणगी देऊन श्रीमंत वरासनावर येऊन बसले. रघूजी आंग्रे आणि हरिपंत फडके, मंडपातील सर्व व्यवस्था जातीने पाहू लागले.

सुवर्णाक्षता वाटण्यात आल्या. खड्या सुरात मंगलाष्टके म्हटली जाऊ लागली. घटिकापात्र बुडताच उपाध्यांनी टाळी वाजविली. अंतरपाट दूर झाला. वधूवरांनी एकमेकांच्या गळचात माळा घातल्या. चौघडे आणि नौबती यांचा एकच कडाका झाला. तोफांची सरबत्ती झाली.

वधूवरांनी छत्रपती महाराजांच्या पायांवर डोके ठेवले, डोळचांना शेला लावीत छत्रपती म्हणाले, "ऊठा, माधवराव.

सुखानं संसार करा,"

मग श्रीमंतांनी वेदोनारायणांचे आणि वडील माणसांचे आशीर्वाद घेतले.

चिरागदाने लावून, नळे चंद्रज्योती उडवीत श्रीमंतांची वरात निघाली. सुमुहूर्तावर श्रीमंत नववधूसह शनिवारवाड्यात दाखल झाले. लक्ष्मीपूजन झाल्यावर, अत्तर गुलाब आणि हारतुरे वाटण्यात आले.

वधूचे नाव ठेवण्याची वेळ आली. तेव्हा पार्वतीबाई म्हणाल्या, "वधूचं नाव रमा ठेवा. रमा माधवाचा जोडा, शनिवारवाड्यात पुन्हा एकदा शोभू द्या."

श्रीमंत सवाई माधवराव आणि सौभाग्यवती रमाबाई यांनी थोरल्या देवघरात जाऊन देवदर्शन घेतले.

सर्वांना भोजन आणि वस्त्रे देण्यात आली. सरसुभे, मामलेदार आणि शिपाईप्यादे यांचाही यथोचित परामर्श घेण्यात आला.

निजामाचे चिरंजीव पोलादजंग विवाह समारंभ झाल्यावर आले. त्यांना इतमामाप्रमाणे खाना देण्यात आला.

विवाह सोहळा आटोपला. छत्रपती महाराज सातारला जाण्यास निघाले. त्यापूर्वी महाराजांना खास मेजवानी देऊन जवाहीर अर्पण करण्यात आले. महाराजांनी श्रीमंतांना आणि नानांना पोषाख दिला. निवडक मंडळी हजर होती. याप्रसंगी राजकारणाचीही चर्चा झाली.

नित्याचे कामकाज सुरू झाले. रामशास्त्री म्हणाले, "श्रीमंत, आपण आता संसारी झालात, आपली जबाबदारी वाढली आहे."

त्यावर नाना म्हणाले, "श्रीमंत, आपण लवकर मोठे व्हा. आणि आम्हाला या राजकारणाच्या व्यापातून मुक्त करा.

रामशास्त्री आणि नाना यांचे बोलणे ऐकून, आपल्या खांद्यावर ओझे ठेवल्याचा भास श्रीमंतांना झाला. तरीही श्रीमंत हसत म्हणाले, "तुम्ही काही काळजी करू नका. आम्ही सर्व जबाबदारी यथावकाश पार पाडू."

## : ५ :

श्रीमंतांचा लग्नसमारंभ भारतभर गाजत राहिला. देवी अहिल्याबाई होळकर यांनी महेश्वराहून लिहिले, "कै० श्रीमंत नानासाहेबांनी माधवराव साहेबांचे लग्न मातबर केले. त्यापेक्षाही सवाई माधवराव साहेबांच्या या लग्नाची तरतूद कारभाऱ्यांनी चांगली केली."

लग्नसमारंभ सुरू असतानाच, इंग्रज आणि मराठे यांच्यामध्ये समेटाची बोलणी सुरू होती. अखेर सालबाईच्या तहाला उभय पक्षांनी मान्यता दिली. या तहाप्रमाणे इंग्रजांनी श्रीमंत रघुनाथरावाबरोबरचे सर्व संबंध तोडले. श्रीमंत रघुनाथराव इंग्रजांचा आश्रय सोडून स्वराज्यात रहावयास आले.

इंग्रजांना आपल्या आरमारी सामर्थ्याचा मोठा गर्व होता. पण आनंदराव धुळप यांनी इंग्रजांच्या आरमारी काफिल्यावर हल्ला चढवून त्यांचा धुव्वा उडविला. आनंदरावांचा हा पराक्रम ऐकून श्रीमंतांचे बाहू स्फुरण पावू लागले. श्रीमंतांनी आनंदरावांना खास खलिता पाठवून अभिनंदन करताना लिहिले, "तुम्ही चाकरी

चांगली केली. सबब तुम्हास बहुमान खासगीचा पोषाख व कंठी पाठविली आहे. घेणे. लोकांनी मर्दुमी केली, त्यांस बक्षिस द्यावयाचे सबब कोणास बक्षीस काय द्यावयाचे ते नावनिशीवार कळविणे– जे लोक सरकारकामास आले, त्यांचे मागे त्यांचे मुलांचेही चाल-विले जाईल. जखमी लोक आहेत, त्यांची बरदास्त चांगली करून लौकर बरे होत ते करणे.

मराठ्यांना सर्वत्र यश मिळत होते. श्रीमंतांचे दिवस आनंदात जात होते. पण या आनंदावर दुःखाची छाया पडली. श्रीमंत पार्वती-बाई कैलासवासी झाल्या. पार्वताबाईची श्रीमंतांना जन्मापासून सवय होती. पार्वतीबाईच्या निधनामुळे श्रीमंतांना एकाकी वाटू लागले.

पार्वतीबाई नंतर श्रीमंत रघुनाथरावही कैलासवासी झाले. त्यावेळी त्यांच्या पत्नी आनंदीबाई या गरोदर होत्या.

आनंदीबाई प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचे नाव चिमाजीअप्पा ठेवण्यात आले. बाजीराव आणि चिमाजीआप्पा यांच्या जन्मापूर्वीच रघुनाथरावांनी अमृतरावांना दत्तक घेतलेले होते.

आनंदीबाई आणि त्यांचे तिघे पुत्र यांना कोठे ठेवावे याबद्दल चर्चा सुरू झाली. तेव्हा श्रीमंत म्हणाले, "आनंदीबाई आजीना आणि त्यांच्या पुत्रांना इथंच आणाव. म्हणजे आम्हालाही कुटुंबा-तील मंडळीचा सहवास लाभेल."

श्रीमंताचे हे बोलणे ऐकूण नानांच्या कानांच्या पाळ्या लाल झाल्या. तरी आत्मसंयमन करून नाना शांतपणे म्हणाले, "श्रीमंत असला अविचार कधीही मनात आणू नका. त्या मंडळीची कधी भेटही घेऊ नका. श्रीमंत रघुनाथराव आणि आनंदीबाईसाहेब

यांच्यामुळेच तुमच्या तीर्थरुपांचा या वास्तुत खून झाला. हे विसरु नका. विषवृक्षाच्या छायेपासून दूर रहा."

नानांचे हे निकराचे बोलणे ऐकल्यावर श्रीमंत पुढे काही बोलले नाहीत.

शास्त्रीपंडीतांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमंत विद्यासंपन्न होऊ लागले. गुरुचरित्राची पोथी वाचण्यास श्रीमंतांनी सुरुवात केली.

श्रीशिवछत्रपतींपासून थोरल्या माधवराव पेशव्यांपर्यंतच्या मराठ्यांच्या इतिहासाच्या बखरी, नानांनी श्रीमंताकरता मुद्दाम लिहवून घेतल्या. इतिहास आणि काव्यशास्त्र विनोदात श्रीमंत रंगून जाऊ लागले.

श्रीमंतांना तालमीचाही नाद लागला कुस्ती खेळण्यात श्रीमंत आपल्या बरोबरीच्या पोरांना हरवू लागले. शस्त्रे वापरण्यात श्रीमंत तरबेज झाले.

श्रीमंत आपल्या आजीसाहेबांना–गोपीकाबाईना भेटण्या–करता गंगापूरला गेले. बरोबर हरिपंत फडके होते.

आजी आणि नातू यांचे हितगुज सुरु झाले. आजींनी नातवाला सांगितले, "तू पंतप्रधान आहेस हे कधीही विसरू नकोस. छत्रपतींशिवाय कुणापुढं वाकू नकोस. त्याचप्रमाणं छत्रपती हे दौलतीचे स्वामी असून, आपण त्यांचे सेवक आहोत, हे सतत लक्षात ठेव."

एकदा श्रीमंत आजीसाहेबांना म्हणाले., "आपली काहीतरी सेवा आमचे हातून घडावी असं वाटत, सांगा काय करू ?"

"माधवराव, आम्हाला काही नको. तुम्ही मोठे रज्यकर्ते झालात म्हणजे आम्हाला सर्व काही मिळालं, असं आम्ही समजू."

" असं नाही आजीसाहेब, तुम्ही आमच्याकडून काहीतरी घेतलंच पाहिजे"

" ठीक आहे " गोपीकाबाई म्हणाल्या, " आम्ही येथे स्थापन केलेलं श्रीबाळकृष्णजीचं मंदिर तू पाहिलं आहेसच. त्या मंदिराला तू वार्षीक एक लक्ष रुपयांची सनद करून दे"

" उत्तम " श्रीमंत समाधानाने म्हणाले.

श्रीमंतांनी हरिपंत फडके यांना बोलावून घेऊन, सनद तयार करून घेतली. त्या सनदेखाली श्रीमंतानी झोकात सही केली.

" माधवराव नारायण पंतप्रधान "

आजीसाहेबांच्या सहवासात श्रीमंतांना आपण सनाथ झालो असे वाटले. मोठ्या समाधानात श्रीमंत पुण्याला परतले.

श्रीमंतांची खेळाबद्दलची मनस्वी आवड नानांच्या लक्षात आली. तेव्हा पर्वतीखालच्या मैदानात शिकारखाना उभारायचे नानांनी ठरविले. कामाला ताबडतोब सुरूवात झाली.

भव्य शिकारखाना उभा राहिला. पशूपक्षांकरता त्यांच्या योग्यतेची निवासस्थाने बांधण्यात आली.

बंगाली बोलणाऱ्या मैना, पोपट, चंडोलपक्षी यांना भव्य पिंजऱ्यात ठेवण्यात आले. मोरांच्या जोड्या अनंदाने नाचू लागल्या. हरणे बागडू लागली. काळबिटसुध्दा आणून ठेवले. बदके, पाण कोंबड्या, हंस यांचा कलकलाट वाढला.

पाचसातशे ससे, काळे पिवळे आणि अबलक असे पर्वतीच्या वाटेवर, तळ्याचे काठी खोल्या बांधून त्यामध्ये ठेवले. वाघ, सिंह आणि अस्वले साखळदंडांनी बांधून ठेवली. श्रीमंतांच्या या शिकार-

खान्याकरता महादजी शिंदे यांनी गेंडे आणि कबुतरांचे जोड पाठविले.

नाना श्रीमंतांना म्हणाले, "सरकारनी, शिकारखाना पहायला चलावं "

मोठा लवाजमा बरोबर घेऊन श्रीमंत निघाले.शिकारखाना पाहून श्रीमंत संतुष्ट झाले. ते म्हणाले, "नाना, तुमची प्रत्येक योजना भव्य आणि परिपूर्ण असते."

त्या दिवसापासून शिकारखान्यात जाण्याचा छंद श्रीमंताना लागला.

श्रीमंत नानांबरोबर कांही वेळ फडावर बसू लागले. एक दिवस श्रीमंत फडावरील काम पहात असताना, उत्तरेतून महत्वाची बातमी आली. महादजी शिंदे यांनी दिल्लीच्या बादशहांकडून श्रीमंत पेशव्यांच्या नावे, " वकील-इ-मुतलक " म्हणजे संपूर्ण अधिकार असलेला कारभारी "हा किताब संपादन केला होता. त्यामुळे सबंध हिंदुस्थानचा कारभार पेशव्यांचे हाती आला होता. हा कारभार पेशव्याचे सेवक म्हणून महादजी शिंदे यांनी करावयाचा होता.

राजकरणाच्या उलाढाली नित्याप्रमाणे सुरु होत्या. दक्षिणेत टिपू सुलतानाने मराठ्यांच्या मुलखावर आक्रमण करण्यास सुरुवात केली. तेव्हा टिपूचे पारिपत्य करण्याची कामगिरी नानांनी हाती घेतली. स्वतः नानांनी स्वारी बरोबर जाण्याचे ठरविले.

नाना श्रीमंतांना म्हणाले, " श्रीमंत आम्ही मोहिमेवर जात आहो, तेव्हा इकडील... "

"नाना, इकडील बंदोबस्ताबाबत तुम्ही काही काळजी करू नका. वेळप्रसंगी आम्ही योग्य ती व्यवस्था करूच. "

बारा वर्षांच्या श्रीमंतांचा आत्मविश्वास पाहून, नानांना अतीव समाधान वाटले.

नाना मोहिमेवर असतानाच, सालबाईच्या तहाप्रमाणे इंग्रजांचा वकील मि. मॅलेट हा पुणे येथे दाखल झाला.

तिरंदाजीच्या दिवाखाण्यात श्रीमंत आणि मॅलेट यांची पहिली भेट झाली. श्रीमंतांनी मॅलेटला हिंदुस्थानी भाषेत अनेक प्रश्न विचारले. त्यांची उत्तरे मॅलेटने तत्परतेने दिली.

बरोबर आणलेल्या भेटवस्तु श्रीमंतांना अर्पण करुन मि. मॅलेट म्हणाला, " श्रीमंत आमच्या राहण्याच्या जागेसंबंधी, मला काही सांगायचं आहे."

" तुमच्या राहण्याच्या जागेसंबंधी, तुमच्या ज्या अपेक्षा आहेत, त्या बहिरोपंतांनी आम्हाला सांगितल्या आहेत, तूर्त तुम्ही आहात तिथंच रहा. नाना स्वारीवरुन परत आल्यानंतर, तुमच्या जागेबद्दल कायमची व्यवस्था करु. " असे सांगून श्रीमंत निघून गेले. मॅलेट श्रीमंतांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहातच राहिला. तेव्हा बहिरोपंत म्हणाले, " मॅलेटसाहेब, बाहेर जाण्याचा रस्ता या बाजूला आहे."

" बहोत अच्छा " असे म्हणत मॅलेट बहिरोपंतांबरोबर शनिवारवाड्याबाहेर पडला.

श्रीमंतांची परवानगी घेऊन, मि. मॅलेट नानांना भेटण्याकरता बदामीच्या वेढ्यात गेला.

शिमग्याचा सण जवळ आला. श्रीमंतांनी शहर कोतवाल घाशिराम यास बोलावून सांगितले, " घाशिराम, शिमग्याचे

निमित्तानं शहरात कोणतेही गैरप्रकार होणार नाहीत, याबद्दल काळजी घ्या "

" जी, सरकार "

" आणि अशी दवंडी पिटवा की, प्रत्येकाने सण आनंदाने साजरा करावा, पण इतरांना उपद्रव देऊ नये. "

श्रीमंतांच्या हुकमाप्रमाणे ताबडतोब दवंडी पिटविण्यात आली आणि बंदोबस्तही वाढविण्यात आला.

हुताशनीचे दिवशी श्रीमंत दिल्ली दरवाज्यातून बाहेर पडून, सायंकाळी दोन घटका रात्री होळीजवळ आले. श्रीमंतांना सर्वांनी पटापट मुजरे केले. होळीचे दर्शन घेऊन, दरवाज्याजवळ क्षणभर बसून श्रीमंत आत गेले. होलिकोत्सवानिमित्त वाड्यात नाच गाण्याचे आणि खेळांचे कार्यक्रम झाले. शाहीरांचे पोवाडे झाले. कुस्त्या झाल्या. श्रीमंतांनी कलावंत आणि पहिलवान यांना भरपूर बक्षिसे दिली.

रंगपंचमीचा दिवस उजाडला., श्रीमंतांचा व्यायाम झाल्यानंतर त्याचे हाती दुधाचे भरलेले सोन्याचे फुलपात्र देत रमाबाई म्हणाल्या,

" मी आईकडे पुढे जाते. आपण दुपारच्या भोजनाकरता वेळेवर यावं."

" जशी आपली आज्ञा " श्रीमंत हसत म्हणाले.

" इश्श, आज्ञा कसली ? आम्ही आपली विनंती केली. "

मेण्यात बसून सौभाग्यवती रमाबाई माहेरी गेल्या.

प्रहर दिवसा श्रीमंत सासुरवाडीस जाण्यास निघाले. दिल्ली दरवाज्यातून श्रीमंत बाहेर पडले. भोयांनी पालखी पुढे आणली.

पण श्रीमंत शृंगारलेल्या घोड्यावर स्वार झाले. श्रीमंतांचा विश्वासू सेवक हैबती त्यांचे बरोबर निघाला.

श्रीमंतांच्या लव्याजम्याबरोबर घाशीराम कोतवालही जाऊ लागला. तेव्हा श्रीमंत म्हणाले, " घाशीराम ..."

" जी सरकार "

" तुम्ही आमच्या बरोबर येण्याची जरुरी नाही ."

" पण सरकार नानांनी आपल्या संरक्षणाची जबाबदारी माझ्यावर सोपविली आहे ."

" घाशीराम आमचं संरक्षण करण्यास आम्ही समर्थ आहो. तुम्ही त्याची फिकीर करु नका. तुम्ही शहराचा बंदोबस्त ठेवा. जा."

श्रीमंतांच्या सासुरवाडीचा भोजनसमारंभ पार पडला. त्यानंतर परत येताना श्रीमंतांनी शहरात थोडा फेरफटका केला. श्रीमंतांना घोड्यावरुन जाताना पाहून लोकांना आश्चर्य वाटले. श्रीमंतांचे दर्शन घडल्यामुळे प्रजाजनांना आनंदही झाला.

नानांच्या गैरहजेरीत श्रीमंत सर्व गोष्टी मुखत्यारीने पार पाडू लागले. लोकांमध्ये श्रीमंत मोकळेपणाने वावरु लागले.

टिपूवर विजय मिळवून नाना मॅलेटसह पुण्याला परत आले. मॅलेटला द्यावयाच्या जागेबद्दल श्रीमंत आणि नाना यांचे-मध्ये चर्चा झाली. संगमावरील जागा मॅलेटला द्यावयाचे ठरले.

श्रीमंतांची अनुज्ञा मिळताच, मॅलेट संगमावरील मोकळ्या वातावरणात रहावयास गेला.

: ६ :

उत्तरेतून आलेला खलिता नाना वाचीत होते. नानांची मुद्रा चिंताग्रस्त झालेली पाहून श्रीमंतांनी विचारले, "काही विशेष बातमी आहे ?"

"होय श्रीमंत. लालसोटच्या लढाईत महादजींचं प्रचंड नुकसान झालं आहे. त्यांना तातडीनं मदत पाठविणं आवश्यक आहे."

महादजी शिंदे यांच्या मदतीला कोणाला पाठवावे, यासंबंधी बोलणी सुरु झाली. तुकोजीराव होळकर म्हणाले, "आम्ही पाटीलबाबांच्या मदतीला जातो."

तुकोजीरावांनी आपल्या फौजेची तयारी सुरू केली. तुकोजीरावांबरोबर पेशवे घराण्यातील कोणीतरी खाशांनी जाणे आवश्यक होते. तेव्हा नानांनी ही कामगीरी अलीबहाद्दर यांचेकडे सोपविली. अलीबहाद्दर हे श्रीमंत थोरले बाजीराव साहेब आणि मस्तानीबाई यांचे नातू होते.

अलीबहाद्दर श्रीमंतांचा निरोप घेण्याकरता आले. श्रीमंतांना मुजरा करुन ते म्हणाले, " सरकार, आम्ही निघतो. आमचा

कुटुंबकबिला इथंच आहे. श्रीमंताची त्यांच्यावर कृपा असावी "

" त्यांची चिंता तुम्ही करु नका. आम्ही त्यांचा परामर्श घेऊ " श्रीमंतांनी आश्वासन दिले.

तुकोजीराव होळकर आणि अलीबहाद्दर यांच्या फौजा उत्तरेची वाट चालू लागल्या.

श्रीमंत गोपिकाबाईची प्रकृती बिघडल्याची वार्ता गंगापूराहून आली. त्यामुळे श्रीमंत आजीसाहेबांच्या भेटीकरता गंगापूरला गेले. गोपिकाबाईनी पुण्याला यावे म्हणून, श्रीमंतांनी खूप आग्रह केला. पण त्या आल्या नाहीत. श्रीमंत उदास मनाने पुण्याला परत आले.

उन्हाळा संपून पावसाळा सुरु झाला. ढगाळलेल्या वातावरणात श्रीमंतांना जास्तच उदास वाटू लागले. श्रीमंत अशा मन:स्थितीत असतानाच, गंगापूरहून गोपिकाबाईसाहेबांच्या निधनाचे वृत्त आले. ती बातमी ऐकताच श्रीमंत म्हणाले, " नाना आज आम्ही सर्वस्वी पोरके झालो."

न्यायमूर्ती रामशास्त्री फार आजारी झाले. श्रीमंत आणि नाना त्यांच्या समाचाराला गेले.

रामशास्त्री कण्हत म्हणाले, " श्रीमंत, या आजारातून आम्ही वाचत नाही. आपलं दर्शन घडलं, समाधान वाटलं. आता देवाघरी जाण्यास आम्ही मोकळे झालो. "

" शास्त्रीबुवा, आपल्या चिरंजीवांबद्दल आणि कुटुंबियांबद्दल आपल्याला काही सांगायचे आहे ?"

" कांही नाही, श्रीमंत ! आपण त्यांच्या योग्यतेप्रमाणं त्यांचा परामर्श घ्यालच, याबद्दल आमची खात्री आहे "

रामशास्त्र्यांच्या निधनानंतर अय्याशास्त्री यांची न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करण्यात आली.

देवदर्शनाची आणि तीर्थक्षेत्रांची ओढ श्रीमंतांच्या मनाला लागली. श्रीमंत टोक्यास गेले. तेथून गंगापूरला आले. तेथेच ग्रहण झाले. श्रीमंतांची सुवर्णतुला करून, ते धन वाटून टाकण्यात आले.

श्रीमंतांनी काही दिवस नाशिकला मुक्काम केला. श्रीमंत भाऊसाहेबांनी बांधलेल्या श्री त्रिबकेश्वराच्या देवालयाला सोन्याचा छोटा रथ अर्पण करून, श्रीमंत पुण्याला आले.

मि. मॅलेट याचे शनिवारवाड्यातील जाणे येणे वाढले. श्रीमंतांच्या उमद्या व्यक्तिमत्वाने मॅलेट भारला गेला.

मॅलेट श्रीमंतांना भेटण्याकरता शनिवारवाड्यात आला होता. मॅलेटबरोबर एक उंच इंग्रज गृहस्थ होता. त्याने आपल्या–बरोबर एक मोठी पेटी आणली होती.

श्रीमंतांना अभिवादन करून मॅलेट म्हणाला, "सरकार, हे मि. वेल्स चांगले चित्रकार आहेत."

बरोबर आणलेली पेटी उघडून, वेल्सने श्रीमंतांना अनेक सुंदर चित्रे दाखविली. श्रीमंतांना ती फारच आवडली.

श्रीमंतांनी शनिवारवाड्यात एक चित्रशाळा उभारली. मि. वेल्स हा या चित्रशाळेत मार्गदर्शनाचे काम करु लागला. गुणी चित्रकारांना आणि मूर्तीकारांना श्रीमंतांनी आश्रय दिला. चित्रकार गंगाराम आणि मूर्तीकार बखतराम हे चित्रशाळचे प्रमुख झाले. स्वत: श्रीमंतही कधी कधी हातात कुंचला घेऊ लागले. चित्रसृष्टीत आणि रंगसंगतीत त्यांचे मन रमले.

मि. मॅलेटने श्रीमंतांना संगमावर येण्याचे आमंत्रण दिले. श्रीमंत आणि नाना यांचे मॅलेटने मन:पूर्वक स्वागत केले. संगमा-वर मॅलेटने उभारलेली बादशाही आणि इमारती पाहून श्रीमंतांचे मन प्रसन्न झाले.

मॅलेट श्रीमंतांना म्हणाला, " आपण जरा गच्चीवर जाऊ या ? " " अवश्य " श्रीमंत म्हणाले.

मॅलेटच्या मागून झरझर पायऱ्या चढत श्रीमंत गच्चीवर गेले. गच्चीवरील मनोऱ्यावर जाताच मॅलेटने श्रीमंतांच्या हाती दुर्बीण दिली.

दुर्बीण डोळ्यांना लावताच, श्रीमंतांना लांबच्या वस्तू जवळ आणि स्पष्ट दिसू लागल्या. पुण्याचा परिसर पाहण्यात श्रीमंत रमून गेले.

जेवणाची वेळ होताच सर्व मंडळी खालच्या दिवाखान्यात आली. मॅलेट श्रीमंतांना म्हणाला, " सरकार, आपण जरा इकडे यावं"

एका मेजावर सूक्ष्मदर्शक यंत्र ठेवलेले होते, मॅलेटने श्रीमंतांना त्यांच्या हातातील आंगठी काचेखाली ठेवण्यास सांगितले श्रीमंतांनी सूक्ष्मदर्शक यंत्रातून पाहाताच, आंगठीच्या हिऱ्याच्या खड्यात बसविलेली श्रीगजाननाची मूर्ती स्पष्टपणे दिसू लागली. मॅलेटने दुर्बीण आणि सूक्ष्मदर्शक यंत्र श्रीमंतांना भेट म्हणून दिले.

मेजवानीनंतर बैठकीच्या दिवाणखान्यात श्रीमंत काही वेळ विसावले. एका स्थूल गृहस्थाना पुढे आणीत मॅलेट म्हणाला,

" श्रीमंत, हे डॉक्टर फिंडले, हे वैद्यशास्त्र उत्तम प्रकारे जाणतात. जणू धन्वंतरीच आहेत असं समजा."

मॅलेटच्या तोंडून धन्वंतरी हा शब्द ऐकताच, श्रीमंत आणि नाना हसू लागले. मॅलेट म्हणाला, " श्रीमंत, एक विनंती आहे."

" बोला, मि. मॅलेट. "

" सरकार आमचा धर्म दुःखितांची सेवा करावी असं सांगतो.' प्रभू येशूचा तसा आदेश आहे. पुण्यातील गोरगरीबांना मोफत औषधोपचार करावेत, अशी डॉ. फिडले यांची इच्छा आहे. तरी त्याबाबत आपली परवानगी असावी." मि. मॅलेट, दीनावर दया करावी असं आमचाही धर्म सांगतो. तुम्ही गोरगरीबांना जरूर औषधे द्या. त्यांना रोगमुक्त करा. पण हे करीत असताना, आमच्या धर्मात ढवळाढवळ करण्याचा कधीही प्रयत्न करू नका. त्याचप्रमाणे औषधे देत असताना राजकारणाचे डाव खेळू नका. येतो आम्ही."

श्रीमंत आणि नाना निघून गेले. मि. मॅलेट आणि डॉ. फिडले डोळे विस्फारून एकमेकांकडे पहातच राहिले.

शनिवारवाड्याच्या प्रचंड आणि भव्य वास्तूमध्ये श्रीमंतांना कधी कधी अगदी एकाकी वाटत असे श्रीमंत रमाबाईंना म्हणत, " खूप नातेवाईक असावेत असं आम्हाला वाटतं "

त्यावर रमाबाई हसून म्हणत, " ते आता कसं शक्य आहे? आपण दोघांनीच आपली काळजी घेतली पाहिजे."

आपले मन कोठल्या तरी गोष्टीत रमविण्याचा श्रीमंत सतत प्रयत्न करीत असत. एकदा डॉ. फिडले श्रीमंतांच्या भेटीकरता आला. त्याने श्रीमंतांना पृथ्वीचा गोल आणि जगाचा नकाशा अर्पण केला. तेव्हा श्रीमंतांनी त्याला पाचशे रुपये बक्षीस दिले.

डॉ. फिडलेच्या तोंडून ऐकलेली जगाची माहिती, श्रीमंतांना चित्त-वेधक वाटली. तेव्हा श्रीमंतांनी डॉ. फिडलेजवळ खगोलशास्त्र आणि भूगोलशास्त्र यांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली.

श्रीमंतांचे आप्त अलीबहाद्दर यांचे चिरंजीव समशेरबहाद्दर यांचा सुंता समारंभ होता. त्याचे आमंत्रण श्रीमंतांना आले. श्रीमंत समशेरबहाद्दरांच्या घरी गेले. नानाही तेथे आले.

श्रीमंतांच्या चरणांना स्पर्श करून, समशेरबहाद्दरांनी त्यांचे आशीर्वाद घेतले. श्रीमंतांतर्फे समशेरबहाद्दरना वस्त्रे, मोत्याची कंठी आणि शिरपेच देण्यात आला. श्रीमंत नानांना म्हणाले, " यांचे शादीकरताही पाच हजार रुपये द्या "

मग श्रीमंतांनी समशेबहाद्दरना हसत विचारले, " आपली काही खास मागणी आहे ?"

"सरकार, आम्हाला बसायला चांगली लहान घोडी मिळावी.

" एवढंच ना ? आमची सुरतपाक घोडी आजपासून तुम्हाला दिली आहे."

मग घरच्या सर्व मंडळींची विचारपूस करून श्रीमंत निघाले. श्रीमंतांनी दाखविलेली ही आपुलकी आणि जिव्हाळा पाहून, अली-बहाद्दरांच्या कुटुंबियांना धन्यता वाटली.

श्रावण महिना संपला आणि श्रीगजाननाच्या आगमनाकरता पुणे सिद्ध झाले. यावर्षी शनिवारवाड्यातील उत्सव मोठ्या प्रमाणात करावयाचा होता. त्यामुळे सर्व तयारी जोरात सुरू होती.

दुपारच्या विश्रांतीनंतर श्रीमंत गणेशमहालात आले. हंड्या-झुंबरे टांगली जात होती. गणपतीच्या कमानदार मखराची श्रीमंत

पाहणी करीत होते. एवढ्यात मोठा गलका कानावर आला. शनिवारवाड्याबाहेर ब्राह्मणांचा मोठा जमाव जमला होता. त्या सर्वांच्या पुढे मानाजीराव फाकडे होते.

श्रीमंतांची अनुज्ञा मिळताच मानाजीराव वाड्यात आले. श्रीमंतांना मुजरा करून ते म्हणाले, "सरकार, मोठा अनर्थ झाला आहे. घाशीराम कोतवालांनी एकवीस ब्राह्मणांचे प्राण घेतले आहेत..."

"म्हणजे असं झालं तरी काय?"

"ऐकावं, श्रीमंत" मानाजीराव म्हणाले, "घाशीरामांनी काही ब्राह्मणांना चावडीखालील भुयारात कोंडलं. त्यामुळं गुद-मरून जाऊन त्यातील एकवीस ब्राह्मण मृत्यू पावले. या घोर अन्यायाबद्दल घाशीरामांना शासन व्हावं, असा आमचा श्रीमं-तांच्या पायाशी अर्ज आहे."

"ठीक आहे. मानाजीराव तुम्ही शांत रहा. आम्ही या प्रकरणाची आताच चौकशी करतो."

एवढ्यात नानाही वाड्यात हजर झाले. घडलेल्या प्रकारा-बद्दल त्यांना कोणतीच माहिती नव्हती. घाशीराम कोतवालाला ताबडतोब बोलावणे पाठविण्यात आले.

घाशीराम हजर झाला. त्याचा चेहरा घाबरलेला होता. श्रीमंतांनी विचारले, "तुमच्या अंधारकोठडीत ब्राह्मण मेले असं आम्ही ऐकतो. याबाबत काय खरी हकिगत असेल ती सांगा."

श्रीमंतांना मुजरा करून; घाशीराम म्हणाला, "सरकार ब्राह्मण मेले ही गोष्ट खरी आहे, पण त्यात माझा अपराध काही

नाही. ब्राह्मणांनी मळ्यातील कणसं चोरली, म्हणून त्यांना अंधारकोठडीत ठेवण्यात आले. त्यातील काहीजण अफू जास्त खाल्यामुळं मेले, यात माझा दोष..."

"खामोष," श्रीमंत कडाडले, "घाशीराम, आम्ही तुम्हाला हकीगत विचारली आहे. तुम्ही चूक आहात की बरोबर आहात हे विचारले नाही"

श्रीमंतांचा हा रुद्रवतार पाहून, घाशीराम हादरला. श्रीमंतांच्या चरणांना स्पर्श करीत तो म्हणाला, "सरकार आपण आमचे मायबाप आहात, माझ्यावर दया करा. माझी चूक झाली. इतक्या ब्राह्मणांना लहानशा जागेत कोंडायला नको होतं मला क्षमा करा."

श्रीमंतांचा चेहरा लालबुंद झाला. त्यांनी चोपदाराच्या हातातील छडी आपले हाती घेतली. तेव्हा नाना झटकन पुढे होऊन हलकेच म्हणाले, "श्रीमंत .."

छडी नानांचे हाती देत श्रीमंत म्हणाले, "घाशीराम नानांनी मध्यस्थी केल्यामुळंच आम्ही हात आवरता घेतला आहे. नाहीतर आम्ही स्वतःच तुम्हाला वेतानं फोडून काढलं असतं."

आणखी काही संबंधित लोकांना बोलावून आणून श्रीमंतांनी सर्व चौकशी केली. घाशीरामच्या अपराधाबद्दल, श्रीमंतांची खात्री पटली. तेव्हा श्रीमंत म्हणाले, "घाशीराम..."

"जी सरकार."

"तुमची नेमणूक लोकांचं रक्षण करण्याकरता केली आहे.. प्राण घेण्याकरिता नाही. एकवीस लोकांची हत्या केल्याबद्दल तुम्हाला एकवीस वेळा फासावर चढविलं पाहिजे. पण आम्ही

तुम्हाला एकदाच देहदंड देणार आहो''

श्रीमंतांनी घाशीरामाला देहांत प्रायश्चिताची शिक्षा फर्मा-विली. श्रीमंतांच्या आज्ञेची अंमलबजावणी ताबडतोब करण्यात आली.

श्रीमंतांच्या या निर्णयामुळे जुलमी अधिकाऱ्यांना दहशत बसली, तर गोरगरिबांना दिलासा वाटला. श्रीमंतांच्या न्यायी-पणाची सर्वजण तारीफ करू लागले.

गणेशचतुर्थीला शनिवारवाड्यात "श्रीं" चे आगमन झाले. उत्सवाला थाटात सुरूवात झाली.

"श्रीं" च्या दर्शनाकरता म्हणून मि. मॅलेट शनिवार-वाड्यात आला. त्याच्याबरोबर, मेजर प्राईस हा नवा पाहुणा होता.

मॅलेट आणि प्राईस यांनी दरबाराच्या दिवाणखान्यात प्रवेश केला. तेथील भव्यता, टापटीप, वैभव आणि साधेपणा पाहून प्राईस मंत्रमुग्ध झाला. त्याची नजर चौफेर फिरू लागली.

सर्वत्र पांढरी स्वच्छ बिछाईत पसरली होती. मध्यभागी किमती गालिचावर लोडतक्क्यांची जरतारी बैठक होती. श्रीमंत पेशवे मसनदीवर विराजमान झाले होते. श्रीमंतांच्या गळ्यातील रत्नहार अत्यंत तेजस्वी होता. हारामध्ये एका आड एक असे जायफळाच्या आकाराचे तेजस्वी हिरे आणि पाचू बसविलेले होते. नाना श्रीमंतांच्या उजव्या बाजूला बसले होते. मानाजीराव फाकडेही दरबारात हजर होते.

श्रीमंतांना अभिवादन करून, मॅलेट आणि प्राईस आपल्या विजारी सावरीत, मांड्या घालून मऊ बैठकीवर बसले.

दरबाराच्या रीतीप्रमाणे प्रश्नोत्तरे झाली. पाहुण्यांना काश्मिरी शाली भेट म्हणून देण्यात आल्या.

पाहुणे " श्रीं " च्या समोर आले. त्यांनी " श्रीं " ना हात जोडून नमस्कार केला. मखराभोवतालची आरास पाहुण्यांना आवडली. प्रसादाचे मोदकही त्यांनी चवीने खाल्ले.

" श्रीगजानन" या देवाबद्दल प्रश्न विचारण्यास पाहुण्यांनी सुरूवात केली. सर्व माहिती सांगून श्रीमंत म्हणाले, " गणपती म्हणजे बुद्धी, विद्या आणि शक्ती यांचे दैवत आहे."

पाहुण्यांनी माना डोलावल्या. मेजर प्राईस म्हणाला, " गणपतीची सोंड पाहताच हत्तीची आठवण होते. हत्ती हा साधाभोळा प्राणी आहे "

" पण मि. प्राईस..." श्रीमंत मध्येच म्हणाले.

" काय, श्रीमंत ?"

" हत्तीच्या सोंडेत मोठी शक्ती असते. हत्तीवर समोरून हल्ला करण्याची हिंमत सिंहालाही होत नाही. सिंहालासुद्धा हत्तीवर मागूनच छुपा हल्ला करावा लागतो, हे लक्षात ठेवा."

श्रीमंत सहज बोलले. पण श्रीमंतांनी आपल्यालाच चिमटा काढला, असे मॅलेटला वाटले. त्याने आपल्या कोटाची कॉलर जरा सैल केली. मग पाहुण्यांनी श्रीमंतांचा निरोप घेतला.

कन्यागत असल्यामुळे कृष्णस्नानाकरता वाईस जावे, तेथून राजधानी सातारा येथे जाऊन छत्रपती महाराजांचे दर्शन घ्यावे, असा बेत श्रीमंत आणि नाना यांनी केला.

वाटेत मुक्काम कोठे करावयाचे याबद्दल चर्चा सुरू झाली. तेव्हा श्रीमंतांनी सांगितले, " आम्ही कोणाच्याही घरी उतरणार नाही, आमचा मुक्काम तंबूत राहील "

श्रीमंताबरोबर शाही लवाजमा घेण्यात आला. मॅलेटही श्रीमंतांच्या स्वारीबरोबर निघाला.

वाई क्षेत्रात श्रीमंतांनी पुष्कळ दानधर्म केला. नंतर मॅलेट आणि श्रीमंत महाबळेश्वराला गेले. तेथील मोकळे वातावरण श्रीमंतांना अतिशय आवडले. शिकारीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. श्रीमंतांचे अश्वारोहणातील आणि शिकारीतील कौशल्य पाहून मॅलेट आश्चर्यचकित झाला.

मॅलेट श्रीमंतांना म्हणाला, " सरकार, आमच्या देशातील हवामान असं थंडगार आणि उत्साहवर्धक असतं "

" मग एवढं चांगलं हवामान सोडून, तुम्ही आमच्या या उष्ण देशात कशाकरता आलेत ?"

श्रीमंतांच्या या प्रश्नाला काय उत्तर द्यावे, हे मॅलेटना समजेना! आकाशाकडे हात दाखवित तो म्हणाला, "God knows!"

श्रीमंत वाईला परत आले. मॅलेटला बरोबर न घेता श्रीमंत आणि नाना राजदर्शनाकरता साताराला गेले.

श्रीमंतांनी छत्रपतींच्या चरणांना स्पर्श केला. त्यांना वर उठवीत महाराज म्हणाले " प्रधानपंत, आम्ही तुम्हाला तुमच्या लग्नात पाहिलं होतं. तेव्हा तुम्ही लहान होतात. आता तुम्ही चांगले जाणते झाले आहात."

श्रीमंतांनी छत्रपती महाराजांना पोषाख बादली, दोन हत्ती, घोडा, जवाहीर, कंठी आणि शिरपेच अर्पण केला. महाराजांनीही सर्वांना दुप्पटे दिले.

श्रीमंतांनी राजमातेचेही दर्शन घेतले आणि राणीसरकारांचे आशीर्वाद घेतले.

राजकारणाची बोलणी झाली. महाराजांनी सांगितले, " माधवराव, आपला खरा शत्रू इंग्रज आहे, हे सतत ध्यानात ठेवा."

उपहार झाल्यानंतर श्रीमंतांनी राजकुटुंबाचा निरोप घेतला.

खुल्या वातावरणातील हा दौरा श्रीमंतांना फारच मानवला. वाईस रास्ते, किकवीस बाबर पागे, भुईंजेस जाधव, पळशी येथे पंतप्रतिनिधी या सर्वांचा पाहुणचार स्वीकारून, श्रीमंत पुण्यात दाखल झाले.

## : ७ :

उत्तर भारतात महादजी शिंदे यांनी मराठ्यांचा अंमल प्रस्थापित केला. दिल्लीच्या लाल किल्ल्यात स्वराज्याच्या भगव्या ध्वजाला प्रवेश मिळाला.

श्रीमंतांच्या भेटीची ओढ महादजींच्या मनाला लागली. बरोबर मोठी कवायती फौज आणि वैभवशाली सरंजाम घेऊन, महादजी पुण्याला येण्यास निघाले.

महादजी पुण्यानजीक आले. श्रीमंतांच्या भेटीचा मुहूर्त ठरला.

भेटीकरता भव्य शामियाना उभारण्यात आला. श्रीमंतांचे दर्शन घडताच महादजींनी श्रीमंतांच्या चरणावर मस्तक ठेवले. श्रीमंतांनी महादजींना वर उठवून आपले गळ्यातील मोत्यांची माळ त्यांच्या गळ्यात घातली.

अठरा वर्षांच्या तरुण श्रीमंतांना पाहून महादजींना अतिशय आनंद झाला. गहिवरल्या कंठाने ते म्हणाले, "धनी..." महादजींना पुढे काही न बोलता आले नाही. खांद्यावरच्या जरी उपरण्याने त्यांनी आपले आनंदाश्रू टिपले.

महादजी श्रीमंतांच्या भेटीकरता शनिवारवाड्यात आले. नाना आणि हरिपंत फडके तेथे होते.

महादजी म्हणाले, " श्रीमंतांकरता आम्ही " वकील-इ-मुतलक " ची वस्त्रं आणिली आहेत. ती श्रीमंतांना समारंभपूर्वक अर्पण करावी, अशी आमची इच्छा आहे.

त्यावर नाना म्हणाले, " पाटीलबाबा, आपण दिल्लीच्या बादशहांकडून जे फर्मान आणलं आहे, त्यामध्ये श्रीमंतांना " महाराजाधिराज " ही पदवी लावली आहे. पेशवे हे छत्रपतींचे सेवक आहेत, त्यांना " महाराजाधिराज " ही पदवी कशी धारण करता येईल ?"

" नाना तुमचा हा आक्षेप मला योग्य वाटत नाही. छत्रपतींचे सेवक म्हणूनच श्रीमंत पेशव्यांनी " महाराजाधिराज" ही पदवी स्वीकारावयाची आहे. "

थोडा वेळ कोणीच काही बोलले नाही. श्रीमंत म्हणाले, "आपण या बाबतीत छत्रपती महाराजांनाच त्यांचे मत विचारावं, असं मला वाटतं."

छत्रपती महाराजांना सर्व हकीगत कळविण्यात आली. छत्रपती महाराजांनी श्रीमंतांना " महाराजाधिराज " ही पदवी घेण्यास परवानगी दिली. आपल्या आज्ञापत्रात छत्रपतींनी शेवटी लिहिले, " वकीलमुतालकी व मीरबक्षीगिरीचे पदांची खिलत व मरातब व फर्दा तुम्ही घेणे."

फर्मानबाडीचा मोठा दरबार भरवून श्रीमंतांना " वकील-इ-मुतलक " ची वस्त्रे आणि किताब अर्पण करण्यात आला.

उत्तरेकडून आणलेल्या अनेक अपूर्व चिजा महादजींनी श्रीमंतांना अर्पण केल्या. त्यामध्ये पाहिजे त्या दिशेला फिरविता येण्यासारखी छत्री असलेली, एक रत्नजडित अंबारीही होती.

दिवाळी जवळ आली. श्रीमंतांकडून महादजींना फराळाचे आमंत्रण गेले. महादजी वाड्यात आले, तेव्हा श्रीमंत सोंगट्या खेळत असल्याचे त्यांना समजले.

महादजींनी मुजरा केला, तेव्हा श्रीमंतांनी त्यांना आपल्या शेजारच्या आसनावर बसविले, सोंगट्यांचा डाव आटोपल्यावर, बुद्धीबळांच्या खेळाला सुरुवात झाली. महादजी आणि श्रीमंत यांचा बुद्धीबळांचा डाव रंगला. श्रीमंतांनी महादजींवर प्यादेमात केली.

श्रीमंतांनी महादजींना आपल्याबरोबर शिकारीला नेले. महादजी आणि श्रीमंत यांचा परिचय वाढू लागला. श्रीमंतांना राजकारणाची खूप माहिती होऊ लागली.

श्रीमंत शस्त्रागारात तलवारी, बंदुका आणि भाले यांची पाहणी करीत होते. एवढ्यात महादजी येऊन म्हणाले, "सरकार, आपण आमचेतर्फे दारुकामाची आतिषबाजी पाहावी, अशी विनंती आहे."

महादजींची विनंती श्रीमंतांनी मान्य केली. सहा घटका रात्रीस श्रीमंतांची स्वारी पर्वतीवर गेली. लोकांच्या गर्दीने पर्वतीची टेकडी फुलून निघाली.

दारुकाम सुटू लागले. नानाप्रकारची झाडे फुलू लागली. तारे चमकू लागले. दारुचा हनुमंत केला होता, तो उडून जाग-

जागी वसू लागला.

या आतषबाजीने श्रीमंतांचे मन प्रसन्न झाले. तेव्हा महादजी हलकेच म्हणाले, "श्रीमंत, एक विनंती आहे."

"बोला पाटीलबाबा! त्याकरता एवढी प्रस्तावना कशाला?"

"श्रीमंत, आपल्या पुण्याईनं दिल्लीचा कारभार आम्ही यशस्वी रीतीनं चालविला. आता पुण्याचा कारभार करून, श्रीमंतांची सेवा करावी, अशी मनीषा आहे."

महादजीच्या बोलण्याचा मतलब श्रीमंतांचे ताबडतोब लक्षात आला. श्रीमंत म्हणाले, "पाटीलबाबा, पुण्याचा कारभार नानांकडे आहे, तोच ठीक आहे. आज आम्ही जे आहोत, ते नानांच्यामुळं आहोत, ते आम्हाला कधीही विसरता येणार नाही. नानांनी आम्हाला आईच्या मायेनं वाढविलं. आम्ही नानांना कधीही सोडणार नाही. तुम्ही उत्तर संभाळावी आणि नानांनी दक्षिण सांभाळावी हेच चांगलं"

महादजींनी श्रीमंतांकडे केलेली विनंती नानांच्या कानावर गेली. तेव्हा नाना श्रीमंतांना म्हणाले, "सरकार, आपण खुशाल महादजींचे हाती कारभार द्यावा आणि आम्हाला काशीयात्रेला जाण्याची परवानगी द्यावी"

"नाना, तुम्ही काशीयात्रेला केव्हा जायचं ते आम्ही ठरवू," श्रीमंत मृदू आवाजात म्हणाले, "पाटीलबाबांची समजूत आम्ही काढली आहे. तुम्ही सुखानं इथला कारभार पहा."

श्रीमंतांनी महादजी आणि नाना यांच्यामध्ये दिलजमाई घडवून आणली श्रीमंत अशा उल्हसित मनःस्थितीत असतानाच; सौभाग्यवती रमाबाई आजारी होऊन कैलासवासी झाल्या. श्रीमंतांना फार दुःख झाले. श्रीमंतांच्या उमद्या चेहऱ्यावरील हास्य मावळले.

श्रीमंतांचे दुसरे लग्न करण्याचे ठरले. गोखल्यांची मुलगी पसंत करण्यात आली. लग्नसमारंभ मोठ्या थाटात पार पडला. श्रीमंतांच्या या दुसऱ्या पत्नीचे नाव यशोदाबाई ठेवण्यात आले.

आरसेमहालात श्रीमंत बसले होते. सरदार–मानकरी हजर होते. बोलण्याच्या ओघात महादजींनी उत्तर भारतातील रंगसमारंभाचे वर्णन केले. महादजी म्हणाले, "श्रीमंत, आपली आज्ञा असल्यास, तसाच रंगसमारंभ आपण इथं घडवून आणू."

श्रीमंतांची अनुज्ञा मिळताच रंगाची तयारी झाली. रंगाचे हौद भरून ठेवण्यात आले.

वानवडीच्या आपल्या छावणीतून, महादजी श्रीमंतांना न्यावयास आले. तेव्हा शनिवारवाड्यातच रंग खेळावयास प्रारंभ झाला. हजारो गुलाल गोटे उडू लागले. रंगाचे बंब चालू झाले. रंग खेळत श्रीमंत महादजींच्या छावणीत गेले. तेथे शिद्यांच्या तमाम फौजेने श्रीमंतांना मानाचा मुजरा केला. शिद्यांच्या छावणीत रंगाचा पाऊस पडला.

या अपूर्व रंगसमारंभाचे वर्णन करताना शाहीर म्हणू लागले,

"जैसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनि द्वापारात ।
तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगात अति आदरात ।।"

रंगाच्या समारंभापासून श्रीमंतांच्या मनाचा रंग पालटला. नव्या हिरीरीने श्रीमंत कारभार पाहू लागले.

महादजी श्रीमंतांच्या दर्शनाकरता नुकतेच वाड्यात आले होते. एवढ्यात उत्तरेकडून एक तातडीचा खलीता आला. खलित्यामधील वृत्त धक्का देणारे होते. लाखेरी येथे शिंदे आणि होळकर यांची निकराची लढाई होऊन, होळकरांचा संहार झालेला होता ! !

ही बातमी ऐकून महादजींना अतिशय वाईट वाटले. ते म्हणाले, "होळकर आणि आम्ही म्हणजे श्रीमंतांच्या दौलतीचे सेवक ! त्यांची अशी आपसात जीवघेणी झुंज व्हायला नको होती."

"म्हणूनच आम्ही म्हणतो, पाटीलबावा;" श्रीमंत म्हणाले, "की तुमची जरुरी उत्तरेत जास्त आहे. आता पाटीलबाबा, एकच गोष्ट लक्षात ठेवा. होळकर आणि तुम्ही यांच्यामधील तंटयाचा निर्णय आम्ही करू. या बाबतीत तुम्ही कोणतीही हालचाल करायची नाही"

"श्रीमंतांची आज्ञा आम्हाला मान्य आहे," महादजी सद्गतित होऊन म्हणाले.

लाखेरीच्या युद्धाची वार्ता ऐकल्यापासून, महादजींचे मन राजकारणाबाबत उदासीन होऊ लागले. दसऱ्यानंतर त्यांना तापाची कसर जाणवू लागली. म्हणता म्हणता दुःखणे विकोपाला गेले. श्रीमंत महादजींच्या समाचाराला गेले. महादजींची परिस्थिती गंभीर होती. वैद्यकीय उपचारांबद्दल चौकशी करून

श्रीमंत हे आबा चिटणीसांना म्हणाले, "उदईक सोनपुतळ्या पाठवून देतो. पाटिलबाबांची तुला करून, ते सोने दान करा."

श्रीमंत वाड्यात येऊन पोहचले नाहीत, तोच महादजींच्या निधनाची बातमी आली. श्रीमंतांना पराकाष्ठेचे दुःख झाले. श्रीमंतांच्या उपस्थित लष्करी इतमामात महादजींचा अंत्यविधी पार पाडण्यात आला. श्रीमंत नानांना म्हणाले, "आज दौलतीचं निम्मं बळ संपलं"

महादजींच्या निधनानंतर, आनंदीबाईंचे सुतक पाळण्याची वेळ श्रीमंतांवर आली. त्यावेळी आनंदीबाईंच्या मुलांना म्हणजे आपल्या चुलत्यांना भेटण्याकरता आनंदवल्लीला जावे, असे श्रीमंतांना वाटले, पण तो विचार अमलात आला नाही.

सेनापती हरीपंत फडके कैलासवासी झाले. हरीपंतांचे काम, त्यांचे चिरंजीव बाबा फडके यांचेकडे सोपविताना श्रीमंत म्हणाले, "वडिलांचा लौकिक कायम राखा"

श्रीमंतांच्या पायांना स्पर्श करीत बाबा फडके म्हणाले, "श्रीमंत; चाकरीत कधीही कसूर होणार नाही, याबद्दल मी खात्री देतो."

: ८ :

महादजी शिंदे यांचे दत्तकपुत्र दौलतराव, यांचे हाती श्रीमंतांनी शिंद्यांच्या दौलतीचा कारभार सोपविला. या वेळी दौलतराव फक्त चौदा वर्षांचे होते.

श्रीमंतांच्या भेटीकरता परशुरामभाऊ पटवर्धन वाड्यात आले होते. गोष्टीच्या ओघात परशुरामभाऊ श्रीमंतांना म्हणाले, "सरकार, फ्रान्स देशाच्या बादशहाला त्याच्या रयतेनंच बंड करून, मारलं."

हे बोलणे सुरू असतानाच मि. मॅलेट तेथे आला. त्याने फ्रान्समधील राज्यक्रांतीची संपूर्ण माहिती श्रीमंतांना दिली. त्यावर श्रीमंत उद्गारले, "राजा हा लोकांच्या रक्षणाकरता असतो. तोच जर लोकांवर जुलूमजबरदस्ती करु लागला, तर लोक बंड करणारच."

मॅलेटने श्रीमंतांना विचारले, "सरकार, आज तुम्ही आम्हाला तुमचा शिकारखाना दाखविणार आहात ना ?"

"होय, आमच्या लक्षात आहे ते," श्रीमंत बैठकीवरून उठत म्हणाले.

पोषाख करून श्रीमंत वाड्याबाहेर आले आणि घोड्यावर स्वार झाले. श्रीमंतांबरोबर मॅलेट आणि परशुरामभाऊही निघाले

शिकारखान्याजवळ जाताच श्रीमंत घोड्यावरून खाली उतरले. मॅलेट श्रीमंतांबरोबर शिकारखाना पाहू लागला.

हरणांच्या पाठीवरून श्रीमंत मायेने हात फिरवू लागले. त्यातील एका हरिणीच्या पाठीवर गाठ आली होती. त्या हरिणीवर औषधोपचार करण्याची श्रीमंतांनी व्यवस्था केली. एक धष्टपुष्ट असणारा काळवीट रोड झालेला पाहून श्रीमंतांनी तेथील सेवकाला सांगितले, "याच्या चाऱ्यात वेलदोडे अधिक टाकीत जा आणि त्याला मधून मधून लोणीही खायला द्या."

श्रीमंतांचे हे वागणे पाहून मॅलेट म्हणाला, " सरकार, या मुक्याप्राण्यांबद्दल आपल्याला एवढं प्रेम वाटतं, तर आपल्या प्रजाजनांबद्दल तुम्हाला किती माया वाटत असेल ?"

मॅलेटचे हे बोलणे ऐकून श्रीमंत काही बोलले नाहीत. पण श्रीमंतांचे डोळे पाणावले आहेत, असे मॅलेटला वाटले !

मंडळी मोकळ्या मैदानात आली. तेथे श्रीमंतांच्या दर्शनाकरता शेकडो लोक जमले होते. त्यांनी श्रीमंतांना पटापट मुजरे केले.

श्रीमंतांचे खास घोडे मोतद्दाराने पुढे आणले. श्रीमंतांनी धावत्या घोड्यावर सहज उडी घेतली. घोड्याला घाम फुटेपर्यंत श्रीमंतांनी दौड केली. घोड्यावरून खाली उतरत श्रीमंत परशुराम भाऊंना, म्हणाले, " भाऊ आज तुमचा आमचा बोथाटीचा सामना होऊन जाऊ द्या."

भाऊंना श्रीमंतांनी अभिवादन केले. भाऊंनी श्रीमंतांच्या चर-

णांना स्पर्श केला. ५ाथाटीचा सामना विलक्षण रंगला. भाऊ हसत म्हणाले, "आम्ही हरलो" मग श्रीमंतांनी भाऊंना मिठीच मारली.

भालाफेकीच्या शर्यतीला प्रारंभ झाला. मध्यभागी दगडांची रास करण्यात आली. घोड्यावर बसून, मैदानातून फेऱ्या मारीत असतानाच ती रास भाल्याने खाली पाडावयाची होती. भाल्यांच्या टोकाला एक लहानसा लाल चेंडू बसविलेला होता.

अनेकांनी दगडांची रास खाली पाडण्याचा प्रयत्न केला. परशुरामभाऊनींही शिकस्त केली. पण कोणालाच ते जमले नाही.

मग श्रीमंतांनी घोडा भरधाव सोडला आणि बघता बघता भाल्याच्या प्रहराने ती दगडांची रास खाली पाडली. लोकांनी टाळ्या वाजवीत श्रीमंतांचा जयजयकार केला.

श्रीमंत वाड्यात परतले. तेव्हा नाना म्हणाले, "श्रीमंत, सायंकाळी निवडक मंडळींची बैठक बोलाविली आहे. निजामाच्या प्रकरणाचा एकदा सोक्षमोक्ष लावावयाचा आहे आपण..."

"आम्ही बैठकीला हजर राहू आणि आजच काय तो निर्णय घेऊ."

निजामांकडे मराठ्यांची तीन कोटी रुपये खंडणी तुंबली होती. निजामांचा दिवाण मशीरुन्मुल्क हा वाकड्या चालीने वागणारा होता. तो निजामांना म्हणाला, "हुजूर, या मराठ्यांना तीन कोटी रुपये देण्यापेक्षा, आपण तीन कोटी रुपये खर्च करून सैन्य उभारू आणि मराठ्यांचा धुव्वा उडवून टाकू."

निजामाविरुद्ध वातावरण तापलेले होते. मसलतीच्या दिवाणखान्यात बैठक भरली. दौलतराव शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन,

बाबा फडके आणि निवडक मंडळी हजर होती.

श्रीमंतांचे आगमन होताच बोलणी सुरू झाली. नाना म्हणाले, ' निजामांच्या मनात तडजोड करण्याचं आहे. पण त्यांचा दिवाण मशीरुन्मुल्क हा तहाच्या आड येत आहे. भरदरबारात त्याने वल्गना केली आहे की, " आम्ही पुण्यावर स्वारी करून ते जाळून टाकू आणि पेशव्यांस लंगोटी नेसवून, त्यांच्या हाती भोपळा देऊन त्यांची काशीस रवानगी करू " मशीरुन्मुल्क कोणत्याही तडजोडीला तयार नाही "

मशीरुन्मुल्काच्या उद्दामपणाचा हा वृत्तात ऐकून सर्वांना संताप आला. अखेर निजामाजवळ युद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला. श्रीमंत म्हणाले, "या मोहिमेत आम्ही जातीनं हजर राहू."

उत्साहाच्या वातावरणात बैठक संपली. श्रीमंत स्वतः मोहिमेत हजर राहणार असल्याची बातमी समजताच, सैनिकांत नवे चैतन्य निर्माण झाले. रणशिंग फुंकले गेले. नौबतीवर टिपरी पडली. दौलतीतील नामवंत सरदार फौजेसह हजर होऊ लागले.

नाना श्रीमंतांना म्हणाले, " सरकार, आपण मोहिमेवर जाणार तेव्हा श्रीमंत बाजीराव आणि त्यांचे बंधू यांना आनंद-वल्लीहून जुन्नरला हलवावं असं मला वाटतं..."

" आपण या तिघांना बरोबरच घेतलं तर "

" श्रीमंत, त्यांना बरोबर घेणं, म्हणजे जळता निखारा पदरी बाळगण्यासारखं आहे. प्रसंगी ते शत्रूला फितूर होण्याला-सुद्धा कमी करणार नाहीत."

"नाना, तुम्ही त्यांचा व्यर्थ संशय घेता. त्यांचे वडील पेशवे-

पदाच्या लोभानं शत्रूला जाऊन मिळाले, म्हणून तेही मिळतील असं आम्हाला वाटत नाही. वैर संपवून टाकावं, पिढ्यान पिढ्या चालवू नये असं आमचं मत आहे.

"श्रीमंत माझं मत मी आपल्याला सांगितलं. त्यातून आपण जो निर्णय घ्याल, तो मला मान्य आहे." नाना निर्धाराने म्हणाले.

नानांना दुखविण्याची श्रीमंतांची इच्छा नव्हती. त्यामुळे श्रीमंत म्हणाले, " नाना, यावेळी तुमच्या मनाप्रमाणं होऊ द्या. पण एक लक्षात ठेवा की, आपण काही त्यांना जन्मभर नजर-कैदेत ठेवू शकणार नाही."

श्रीमंत बाजीराव आणि त्यांचे दोघे बंधू यांना जुन्नर येथे ठेवण्यात आले. त्यांचेवर नजर ठेवण्याची कामगिरी, बळवंतराव नागनाथ वामोरीकर यांचेकडे सोपविण्यात आली.

मराठ्यांच्या फौजा एकत्र होऊ लागल्या. दौलतराव शिंदे यांची कवायती फौज आली. नागपूरकर भोसले, तुकोजीराव होळकर, गायकवाड, फडके, पटवर्धन यांच्या फौजा सज्ज झाल्या.

श्रीमंत आणि नाना डेरेदाखल झाले. श्रीमंतांच्या स्वारी बरोबर मि. मॅलेटही निघाला. दळबादल डेऱ्यात दरबार भरविण्यात आला. मोहिमेचे नेतृत्व परशुरामभाऊ पटवर्धन यांचेकडे देण्यात आले. सर्व सरदारांनी या गोष्टीला अनुमती दिली. दौलतराव शिंदे म्हणाले, " जिथं भाऊंची उडी पडेल, तिथं आम्ही सर्व उडी घेऊ."

रंगपंचमीचा दिवस उजाडला. खर्डा येथे मराठ्यांच्या

आणि निजामाच्या फौजांची गाठ पडली. रिपूरक्ताने मराठे रंगपंचमी खेळू लागले.

आघाडीवर गेलेले परशुरामभाऊ जखमी झाल्याची बातमी समजताच, मराठे चवताळले. त्यांनी एकदम पुढे मुसंडी मारली. शिंद्यांच्या तोफखान्याच्या भडिमारामुळे शत्रूसैनिक धरणीवर कोसळू लागले. नागपूरकर भोसल्यांच्या सैन्याने बाणांचा वर्षाव करून, शत्रूला हतबल करून टाकले. जखमी स्थितीत असतानाच परशुरामभाऊंनी एकदम एल्गार करण्याची आज्ञा दिली. मग हुजरातीच्या सैन्याची चाळीस हजार तलवार उठताच, शत्रूचा थरकाप उडाला.

"हर हर महादेव," छत्रपती शिवाजी महाराज की जय" या घोषणांनी रणमैदान दुमदुमून गेले. निजामाकडील असदल्लीखानाच्या सैन्याचा विनाश झाला. असगुलखान, वजीरखान पठाण, लालखान यासारखे निजामाकडील सरदार समरभूमीवर गारद झाले. निजामी सैन्याला पळता भुई थोडी झाली. स्वतः निजमानी आणि दिवाण मशीरुन्मुल्क यांनी खडर्याच्या गढीचा आश्रय घेतला.

संपूर्ण शरणागती पत्करून निजामांनी तहाची बोलणी करण्यास सुरूवात केली. श्रीमंतांची प्रत्यक्ष भेट व्हावी, अशी विनंती निजामांनी केली. श्रीमंत म्हणाले, " नाना, आम्ही स्वतः निजामांची भेट घेऊ."

" नाही श्रीमंत, असा अविचार करू नका," नाना म्हणाले, " शत्रू दगलबाज आहे. प्रत्यक्ष भेटीत आपला घात होण्याचा संभव आहे."

नानांचे हे म्हणणे श्रीमंतांना पटले नाही. पण या विजयाच्या प्रसंगी मतभेद नको, असा विचार करून श्रीमंतांनी निजामांच्या प्रत्यक्ष भेटीचा बेत सोडून दिला.

निजामांनी मराठ्यांच्या सर्व अटी मान्य केल्या, स्वारीच्या खर्चाबद्दल छकडे भरून रुपये पाठविले. निजामाचा उन्मत्त दिवाण मशीरुन्मुल्क हात बांधून, मराठ्यांच्या छावणीत हजर झाला.

या अभूतपूर्व विजयाबद्दल मॅलेटने श्रीमंतांचे अभिनंदन केले. मॅलेटने आपल्या वरिष्ठांना लिहिले, "मराठे हे आजही हिंदुस्थानात सर्व शक्तीमान आहेत. त्यांच्याजवळ कलह करणे धोक्याचे आहे."

खर्ड्याच्याविजयाची बातमी ताबडतोब छत्रपती महाराजांना सातारला कळविण्यात आली. तेव्हा छत्रपतींनी विजयदर्शक तोफांची सरबत्ती करण्याचा हुकूम दिला. छत्रपती महाराजांनी पंतप्रधान पेशव्यांना आशीर्वाद आणि अभिनंदनपर खलिता पाठविला.

सोन्यारुप्याची फुले उधळीत, विजयी पेशव्यांचे पुण्याने स्वागत केले. खर्ड्याची विजयवार्ता सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात दुमदुमू लागली, शाहीर चढ्या सुरात गर्जू लागले—

"स्वारी नव्हे स्वयंवर जाहले। श्रीमंतांस ऐश्वर्य मिळाले।
अपेश अटकेपार पळाले। यादव सैन्य हरीभोंताले॥
तसेच लष्कर पुण्यात आलें। पहावया जन सर्व निघाले।
दर्शन होता शरीर निवाले। घरोघरी आनंद माइना॥

बा. क्र. २२६० ... २५।१।८८
विषय ... क्र. ८९१:८१

: १ :

आषाढ संपून श्रावण महिना सुरू झाला आकाशात अभ्रे येऊ लागली. अशा वेळी श्रीमंतांना अगदी उदासवाणे वाटू लागे. मग यशोदाबाई विचारीत, "आपण असे खिन्न का? खर्ड्यांच्या स्वारीहून आपण परत आल्यानंतर, आपल्याला ओवाळताना जे तेज मला आपल्या डोळ्यात दिसले, ते आता का दिसत नाही."

"काय सांगू तुला? पण अलीकडे आम्हाला फारसा उत्साह वाटत नाही, हे खरं! स्वारीत असताना सभोवती सारखी माणसं असत. नित्य काहीतरी घडत असे. पण इथं आम्हाला काहीच काम नाही, काळजी नाही. साऱ्या गोष्टी नाना मुखत्यारीनं करीत असतात. आणखीही एक विचार मनात येतो..."

"तो कोणता?"

"सांगतो. थोरल्या बाजीरावसाहेबांना साथ देणारे चिमाजी अप्पा होते. आमच्या आजोबांच्या मागे भाऊसाहेब होते. माधवरावसाहेबांच्या सहाय्याला आमचे वडील होते. पण आम्हाला साथ द्यायला मात्र कोणी नाही. आम्ही अगदी एकटे आहोत."

"आपले तिघे चुलते जुन्नरला आहेत ना? त्यांना बोलावून घ्यावं."

"आम्हालाही तसंच वाटतं. पण नाना त्यांचं नावही घेऊ देत नाहीत. नाना त्यांना विषवल्ली म्हणतात. नानांचं हे म्हणणं आम्हाला पटत नाही. रघुनाथराव आजोबांनी जरी आमच्या वडिलांना दगा केला असला, तरी त्यांचे चिरंजीवही तसेच वागतील असं नाही."

"हे सर्व आपण नानांना सांगत का नाही ?"

यशोदाबाईंच्या या प्रश्नाला श्रीमंतांनी उत्तर दिले नाही. त्याचवेळी पलीकडच्या बाजूने कोणीतरी गेल्याचा भास श्रीमंतांना झाला. तेव्हा श्रीमंत म्हणाले, "पाहिलंस आताच कोणीतरी इकडून गेलं, आमच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवली जाते. या साऱ्या गोष्टी आमच्या हिताकरताच केल्या जातात हे आम्हाला समजतं. पण आवडत नाही. महादजी म्हणत असत तेच खरं..."
"काय म्हणत असत ते ?"

"पाटिलबाबा म्हणत, श्रीमंत तुम्हाला नानांच्या सांगण्याप्रमाणं वागावं लागतं, तुम्ही स्वतंत्र नाही !' आम्हालाही अलीकडे तसंच वाटतं. आमच्या भोवती सारी सुखं हात जोडून उभी आहेत, पण आम्ही आमचे नाही हेच खरं."

मग यशोदाबाई दुसऱ्या गोष्टी काढून, श्रीमंतांचे मन रमविण्याचा प्रयत्न करीत.

श्रीमंत आरसे महालात बसले होते. समोर बुद्धिबळांचा पट मांडलेला होता. नानांनी येऊन विचारले, "श्रीमंत आपण फडा-

वर येणार ना ?"

"नाही नाना, आज आम्ही फडावर येणार नाही. आम्हाला बरं वाटत नाही."

"मग राजवैद्यांना बोलावून घेऊ का ?"

"नको नाना ! तसं आम्हाला काही होत नाही. पण हल्ली या भव्य वास्तूत आम्हाला एकाकी वाटतं......"

"श्रीमंतांनी बरं वाटल्यावर उद्या फडावर यावं" असे म्हणत नाना मुजरा करून निघून गेले.

उत्तरेतून देवी अहिल्याबाई होळकर यांच्या निधनाची बातमी आली. ती ऐकून श्रीमंत खिन्नपणे म्हणाले, "त्यांच्या आमच्या भेटीचा योग कधी आला नाही."

गणेशचतुर्थी आली. शनिवारवाड्यात "श्रीं" चे मोठ्या वैभवात आगमन झाले. खड्र्याच्या लढाईत मराठ्यांना प्रचंड विजय मिळाल्यामुळे, या वर्षीचा गणेशोत्सव विशेष रितीनें साजरा व्हावा असे नानांना वाटत होते.

चतुर्थीचे दिवशी श्रीमंतांच्या अंगात ताप होता. पण श्रीमंत कुणाला काही बोलले नाहीत. "श्रीं" च्या प्रतिष्ठापनेच्या समारंभात त्यांनी नेहमीप्रमाणे भाग घेतला.

श्रीगजाननापुढे होणाऱ्या कार्यक्रमांना श्रीमंत थोडा वेळ बसू लागले. त्या रात्री ज्यांचे गाणे होते, ते गवईबुवा फारच विख्यात होते.

श्रीगजाननाला वंदन करून आणि श्रीमंतांना मुजरा करून, बुवांनी गाण्याला सुरूवात केली.

सारी मंडळी रंगून गेली. श्रीमंत नानांना हलकेच म्हणाले, "आम्ही निघतो. आमची प्रकृती ठीक आहे, काळजी करू नका. तुम्ही मात्र इथं थांबा आणि ठरल्याप्रमाणं सर्व कार्यक्रम पूर्ण करा."

श्रीमंत निघून आपल्या महालात आले. त्यांना अस्वस्थ वाटत होते. अशाच एका गणेशोत्सवाचे वेळी, आपल्या वडिलांचा या वाड्यात खून झाला; या एकाच विचाराने श्रीमंतांच्या मनात सकाळपासून फेर धरला होता.

हवेत थोडा गारवा होता. त्यामुळे श्रीमंतांनी शाल अंगावर घेतली. श्रीमंत खिडकीजवळच्या आसनावर डोळे मिटून स्वस्थ बसले.

काही वेळाने श्रीमंतांनी समोर पाहिले, तेव्हा चित्रशाळेत त्यांना प्रकाश दिसला. श्रीमंत हलकेच चित्रशाळेकडे निघाले. हैबतीही त्यांचे मागून जाऊ लागला.

श्रीमंतांनी चित्रशाळेत प्रवेश केला. चित्रशाळेचा प्रमुख गंगाराम हा दिव्यांच्या प्रकाशात चित्र रंगवीत होता. त्याची पाठ दाराकडे होती. श्रीमंतांनी चित्रशाळेत प्रवेश केला आणि एका कोपऱ्यात ते स्वस्थ उभे राहिले.

काही वेळ तसाच गेला. पण श्रीमंतांना अचानक शिंक आली आणि गंगारामने चमकून मागे पाहिले.

गंगारामाने हातातला कुंचला बाजूला ठेवला. श्रीमंतांच्या चरणांना स्पर्श करीत गंगाराम म्हणाला, "सरकार, आपण "श्रीं"च्या आगमनाचं चित्र रंगवायला सांगितलं होतं ना ? तेच चिता-

रीत होतो. त्यामुळे आपल्याकडे लक्ष गेलं नाही मुजरा करायचा राहून गेला. त्याबद्दल क्षमा असावी."

"गंगाराम, मुजरा करण्याकडे जर तुमचं लक्ष गेलं असतं, तर कलावतांची जिवंत समाधी पाहण्याचं भाग्य आम्हाला लाभलं नसतं" श्रीमंत हसत म्हणाले.

गंगारामाने रेखाटलेले भव्य चित्र श्रीमंतांनी पाहिले. श्रीमंतांचे मन प्रसन्न झाले. आपल्या हातातील हिऱ्याची अंगठी काढून श्रीमंतांनी गंगारामच्या बोटात घातली. श्रीमंत म्हणाले, "गंगाराम, आमची खात्री आहे की, तुमच्या कलेचा गौरव अवघा हिंदुस्थान करील."

गंगारामचे डोळे आसवांनी भरून गेले. अश्रू पुसून गंगा-रामने समोर पाहिले, तेव्हा श्रीमंत निघून गेले होते.

श्रीमंतांना करमत नव्हते. उघडच्या हवेत गेल्यावर जरा बरे वाटेल, या विचाराने श्रीमंत गच्चीवर गेले. तारकांचा लपंडाव नुकताच सुरू झाला होता. श्रीमंतांनी डोळ्यांना दुर्बिण लावली. ताऱ्यांच्या स्वप्नसृष्टीत त्यांचे मन रमून गेले.

हैबतीखेरीज त्या ठिकाणी दुसरे कोणी नव्हते. पावलांचा आवाज आल्यामुळे हैबतीने जिन्याकडे पाहिले. बळवंतराव नाग-नाथ वामोरीकर पायऱ्या चढून वर येत होते.

हैबती बळवंतरावांना काही विचारणार, एवढ्यात बळवंत रावांनी श्रीमंतांच्या चरणावर मस्तक ठेवले.

श्रीमंतांनी विचारले, "बळवंतराव, तुम्ही इथं कसे येऊ शकलात ? तुम्हाला कोणी हटकलं नाही ?"

"सरकार, ही आंगठी जवळ असली म्हणजे मला कोणीही अडवीत नाही," नानांच्या मुद्रेची आंगठी पुढे करीत बळवंतराव म्हणाले, "शिवाय नानांचाही माझ्यावर संपूर्ण विश्वास आहे."

जुन्नर येथे असलेल्या रघुनाथरावांच्या पुत्रांवर नजर ठवण्याची कामगिरी, बळवंतरावांकडे सोपविलेली आहे, याची श्रीमंतांना याद होती. म्हणून श्रीमंतांनी विचारले, "आमचे चुलते बाजीरावसाहेब कसे आहेत?"

हैबतीकडे पाहून बळवंतराव घुटमळले. तेव्हा श्रीमंत म्हणाले, "काय बोलायचं असेल ते मोकळेपणानं बोला. हा हैबती आमच्या पूर्ण विश्वासाचा आहे."

"सरकार, आपल्याला भेटण्याची श्रीमंत बाजीराव-साहेबांची अतिशय इच्छा आहे. त्यांनीच हे पत्र आपल्याला दिलं आहे," असे म्हणत अंगरख्याखाली लपविलेला लखोटा बळवंत-रावांनी श्रीमंतांचे हाती दिला.

श्रीमंतांनी लखोटा फोडून त्यातील मजकूर झटकन वाचला. श्रीमंत हैबतीला म्हणाले, "जरा लेखनसाहित्य घेऊन ये."

हैबती परत येईपर्यंत बळवंतरावांनी श्रीमंतांच्या मनात, बाजीरावांबद्दल अत्यंत अनुकूल ग्रह निर्माण केला.

हैबती आल्यावर श्रीमंतांनी स्वतःच्या हाताने पत्र लिहिले. पत्र बळवंतरावांजवळ देताना श्रीमंत म्हणाले, "बाजीरावकाकांना सांगा की, त्यांची आणि आमची भेट लवकरच होईल. आमच्या मार्गात कोणीही येऊ शकणार नाही."

दुसरे दिवशी दुपारी श्रीमंत महाभारत वाचीत बसले होते. एवढ्यात हैबतीने येऊन त्यांना हलकेच काही मजकूर सांगितला. श्रीमंतांनी ताबडतोब नानांना भेटीसाठी येण्याचा निरोप पाठविला.

नाना येऊन मुजरा करून म्हणाले, "श्रीमंत काही आज्ञा आहे?"

"आज्ञा नाही, आम्हाला काही खुलासा पाहिजे..."

"कोणता खुलासा, श्रीमंत?"

"बळवंतरावांना आपण अटक केलीत?"

"होय श्रीमंत, पण ही बातमी आपल्यापर्यंत एवढ्यात कशी आली?"

"नाना, तुमच्या इतकं मोठं नसलं, तरी आमचंही एक छोटंसं हेरखातं आहे," श्रीमंत म्हणाले, "बळवंतरावांना अटक करण्याचं कारण?"

"सरकार, बळवंतराव आपल्या भेटीला आले होते......"

म्हणून तुम्ही त्यांना अटक केलीत? आम्हाला भेटणं हा गुन्हा आहे?"

...तसं नाही, श्रीमंत! बळवंतरावांनी आपली नुसती भेट घेतली नाही, तर बाजीरावांचा निरोपही आपल्याला सांगितला. आपण स्वतःच्या हस्ताक्षरातील हे पत्रही त्यांना दिलंत," असे म्हणत नानांनी श्रीमंतांचे बाजीरावांना लिहिलेले पत्रच पुढे ठेवले.

नाना कळवळून म्हणाले, "श्रीमंत, बाजीरावांजवळ संबंध ठेवणं आपल्या हिताच्या दृष्टीनं सर्वस्वी अनिष्ट आहे. श्रीमंतांनी

बळवंतरावांच्या कारस्थानात सापडू नये. म्हणूनच मी त्यांना अटक केली."

थोडा वेळ कोणी काहीच बोलले नाही. नाना हात जोडून म्हणाले, "श्रीमंत, पुन्हा एकदा विनवून सांगतो की, बाजीरावां-जवळ कोणताही संबंध ठेवू नका. त्यात आपला विनाश आहे."

"नाना, तुमचं म्हणणं सर्वस्वी खरं आहे असं जरी गृहीत धरलं. तरी बळवंतरावांना अटक करण्यापूर्वी तुम्ही आमचा सल्ला जरूर घ्यायला पाहिजे होता. आम्ही परवानगी म्हणत नाही ! सल्ला म्हणतो ! नाना........"

"आज्ञा, श्रीमंत"

"जन्मभर तुम्ही आमच्याकरता खस्ता खाल्ल्यात ! आम्हाला एखाद्या नाजुक प्राजक्ताच्या फुलाप्रमाणं जपलंत ! पण नाना, आम्ही प्राजक्ताचं फूल नसून पेशवे आहोत, याचा तुम्हाला विसर पडला. आम्ही किती दिवस तुमच्यावर अवलंबून राह्यचं? आमचे निर्णय आम्हाला घेता आले पाहिजेत......"

"पण श्रीमंत........."

"नाना, आता या प्रकरणी आणखी काही बोलण्याची आमची इच्छा नाही. तुमच्याबद्दल पूर्ण आदर मनात ठेवून आम्ही सांगतो की, आतापुरता आम्ही तुम्हाला निरोप दिला आहे."

नाना निघून गेले. त्या दिवसापासून श्रीमंत कमालीचे अबोल झाले.

दसऱ्याचा दिवस उजाडला. श्रीमंतांना थोडी कसर वाटत होती स्नान केल्यावर श्रीमंतांना जरा तोल गेल्यासारखे वाटले.

तेव्हा यशोदाबाई म्हणाल्या, "आज शिलंगणाच्या स्वारीला जाऊ नये. विश्रांती घ्यावी."

"असं कसं म्हणतेस ? खडर्याच्या विजयानंतरचा हा पहिलाच दसरा आहे. आम्ही गेलो नाही तर सर्वांचाच विरस होईल"

वाड्यातील वर्दळ वाढली. शस्त्रास्त्रांचे पूजन झाले. अंबारीत बसून श्रीमंत सर्वांचे मुजरे घेऊ लागले. अचानक श्रीमंतांच्या डोळ्यापुढे अंधारी आली. त्यांची मान पुढे झुकली. खवासखान्यात बसलेल्या अप्पा बळवंतांनी श्रीमंतांना सावरले.

श्रीमंतांना वाड्यात आणून ताबडतोब औषधोपचार सुरू करण्यात आले. श्रीमंतांचे अंगात सणसणून ताप भरला. ज्वरामुळं ग्लानी येऊ लागली.

द्वादशीचे दिवशी सकाळी, श्रीमंत लोंडाला टेकून पलंगावर बसले होते. जवळच श्रीमंतांच्या आजी, ताई साठे या होत्या.

आपल्या आजीजवळ बोलत असतानाच श्रीमंत पलंगावरून खाली उतरले आणि खिडकीजवळ गेले. खिडकीच्या कमानीला हात टेकून श्रीमंत उभे राहिले. हैबती झटकन पुढे झाला आणि श्रीमंतांच्या अंगावरच्या शालीला स्पर्श करीत म्हणाला, "श्रीमंतांनी इथं उभं राहणं ठीक नाही. स्वारींनी पलंगावर जावं"

हैबती अशा प्रकारे श्रीमंतांना समजावीत असतानाच, श्रीमंतांना भोवळ आली आणि ते खिडकीतून खाली कोसळले.

"श्रीमंत पडले" असा एकच कालवा झाला. खालच्या कारंज्यावर पडल्यामुळे. श्रीमंत जबरदस्त जखमी झाले. उजव्या मांडीचे हाड मोडून नाका तोंडातून रक्त बाहेर आले.

BVBK-0402260



नानांनी ताबडतोब श्रीमंतांना ऐने महालात नेण्याची व्यवस्था केली. तबीब आणून हाड बसवून टाके घालण्यात आले. थोडा शेक दिल्यावर श्रीमंतांना बरे वाटले.

पराकाष्ठेचे वैद्यकीय उपचार सुरू झाले. श्रीमंत मध्येच शुद्धीवर येत, तर क्षणार्धात बेशुद्ध होत.

श्रीमंत यशोदाबाईंना म्हणत, संसाराचा डाव सुरू होण्यापूर्वीच संपायची वेळ आली आहे. आम्हाला आमचं काही वाटत नाही. पण तुमचं आयुष्य पुढं कसं जाईल याची काळजी वाटते."

"आपण असं बोलू नये. आपण असं बोलू लागलात की माझा धीर सुटतो. श्रीगजाननाच्या कृपेने आपण नक्की बरे व्हाल," यशोदाबाई परोपरीने सांगत ! !

चांगली शुद्ध असली म्हणजे श्रीमंत नानांना म्हणत. "आमची वेळ जवळ आली ! तुम्ही आमचे नावाचा दुसरा करणे चांगलं. बाजीरावकाकांना आणून त्यांचे हाती राज्यकारभार द्यावा. आमचं कोणाजवळ वैर नाही."

कोजागिरीचे दिवशी श्रीमंतांचा जास्तच वाखा झाला. दीपदर्शनाचे सुमारास बाबा फडके यांचे मांडीवर मस्तक ठेवून श्रीमंत कैलासवासी झाले.

कोजागिरीचा पूर्ण चंद्र आकाशात आला, पण श्रीमंतांच्या निधनामुळे मराठा साम्राज्यावर अमावास्येचा अंधार पसरला.

एकवीस वर्षांचे श्रीमंत सर्वांच्या हृदयाला चटका लावून गेले.

शाहिरांच्या तोंडून कंपित वाणी बाहेर पडू लागली.

"कमी नव्हते पृथ्वींत अवांतर प्राणी न्यायाला ।
आयुष्य कसे कमी झाले सवाई माधवरावाला ।।"